मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः।

# हितगुज

अंक ७३ ❖ संपादिका: डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) ❖ मार्च २००८

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल: maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.) (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय भूमिका



संपादिका: डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे

प्रिय कुलबांधव आणि भगिनींना माझा नेहपूर्वक नमस्कार.

रविवार दि. २३ डिसेंबर २००७ रोजी पुणे येथील पहिल्या जागतिक चित्पावन महासंमेलनाला आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहिलो. त्यानंतर लगेचच मंगळवार दि. २५ डिसेंबर २००७ (नाताळची सुटी) या दिवशी मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेच्या दैनंदिनी प्रकाशन प्रसंगी आपण भेटलो. यावर्षी नेहेमीपेक्षा मोठ्या संख्येने कुलबांधव उपस्थित राहण्याचा योग चित्पावन संमेलनामुळे घडून आला व मुंबई-पुण्याबाहेरून आलेली दूरगांवची मराठे परिवार मंडळी प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाला आत्मीयतेच्या ओढीमुळे सहभागी झाली. परस्पर परिचय झाला. कांही हितगुजचे व प्रतिष्ठानचे सदस्य झाले. काहींनी दैनंदिनीही विकत घेतली. आणि त्यामुळे परस्पर सलोखा वृद्धिंगत होऊन संबंध दृढ होण्याच्या दृष्टीने ते चांगले झाले. मराठे प्रतिष्ठानशी ते सर्व जोडले गेले.

चित्पावन संमेलनात आपले स्वतंत्र मराठे-कुल संमेलन का भरविले नाही अशी आग्रही शंका काही बांधवांनी पत्र-ईमेल-फोनद्वारा व्यक्त केली होती. वास्तविक आपण आपली याविषयीची भूमिका हितगुजच्या मागील अंकात याच सदरात स्पष्टपणे मांडून कार्यकारिणीच्या तशा निर्णयाचा पाठपुरावा केला होता. आपले मराठे संमेलन नेहमीच भरत असते. तेथे आपले भरगच्च कार्यक्रमही असतात. दोन दिवसांचा सदस्यसहवास असतो. मग या घाईगर्दीच्या अर्ध्या दिवसाच्या कुलसंमेलनात आपण यातले काय साधणार आहोत. उलट चित्पावन महासंमेलनाच्या सकाळच्या सत्रातल्या प्रमुख कार्यक्रमांना मुकावे न लागता तेथे आपला संपूर्ण सहभाग देता येईल व या दुर्मिळ संधीचा आनंद पुरेपूर घेता येईल या गोष्टीवर कार्यकारिणी व अध्यक्ष श्री आनंदराव मराठे यांनी एकमताने जोर दिला होता. मुंजीचा सोहळा सार्वजनिक मुंजीत उरकणे आणि स्वतंत्रपणे थाटात साजरा करणे यात फरक आहेच, नाही का? या निर्णयाचे औचित्य प्रत्यक्ष संमेलनाच्या अधिकच प्रकर्षाने प्रत्ययास आले.

(पुढील मजकूर पृ.२२ वर)

## प्रतिष्ठानचा २८वा वर्धापनदिन आणि पुणे शाखा दैनंदिनी २००८ प्रकाशन सोहळा वृत्त

सौ.नीलांबरी रमेश मराठे, व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र, ६४२, नारायण पेठ, नूमवि प्राथमिकशाळेसमोर, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०. फोन : २४४५६२७०



पुणे शाखेतर्फे मराठे प्रतिष्ठानचा २८वा वर्धापन दिन व २००८ च्या दैनंदिनीचे प्रकाशन असे दोन्ही समारंभ मंगळवार दि. २५ डिसेंबर २००७ रोजी एकत्रितरीत्या साजरे करण्यात आले. यावर्षी विशेष म्हणजे रविवारच्या चित्पावन महासंमेलनासाठी खास वडोदरा, सोलापूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक इ. दूरवरून आलेले कुलबांधव या सोहळ्यासाठीही थांबले होते. यामुळे कार्यक्रमाची शोभाही निश्चितच वाढली होती ही उल्लेखनीय बाब आहे.

प्रारंभी सौ. नीलांबरी मराठे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात कु. तनया प्रशांत मराठे हिच्या गणेशवंदना या आकर्षक व बहारदार नृत्याने झाली आणि तिने सर्व उपस्थितांची मने जिंकून घेतली.(पृ २/१ पहा). तिचे कौतुक म्हणून तिला श्रीफल व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.

यानंतर प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री रमाकांत विद्वांस यांच्या शुभहस्ते दैनंदिनी २००८चे प्रकाशन झाले व व्यासपीठावरील अतिथीगण ज्येष्ठ साहित्यिक श्री. ह.मो.मराठे, सुप्रसिद्ध निवेदक श्री भाऊ मराठे, व हितगुजच्या संपादिका डॉ. सौ. सुमेधा मराठे यांचा तसेच प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती

(पुढील मजकूर पृ.२ वर)

❖संपादकीय सहाय्य व अक्षरजुळणी :सीताराम गोपाळ खांबेटे(पृ.६७६)❖

पत्रव्यवहाराचा पत्ता:(१)संपादिका:डॉ.सौ.सुमेधा प्र.मराठे ८/१३,सहकार नगर, वडाळा-प.मुंबई ४०००३१;☎२४१५०८८९

ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com

(२)सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९.☎:२६८३६९९४

सेल-९८३३५६४२६८; ई-मेल :(1) sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in

## क्षणचित्रे

१ 


 ५

२ 

 ६

३ 

 ७

४ 

 ८

१. कु.तनया प्रशांत मराठे -गणेशवंदना नृत्य सादरीकरण.
२. प्रमुख वक्ते सुप्रसिद्ध साहित्यिक श्री.ह.मो.मराठे यांचे स्वागत. (सविस्तर वृत्त पृ.१२)
३. सुप्रसिद्ध निवेदक श्री. 'भाऊ' मराठे यांचा 'धक्का' (सविस्तर वृत्त पृ.१०)
४. कु.सानिका विनोद जोशी हिला चौथीच्या स्कॉलरशिप परिक्षेतील उज्ज्वल यशाबद्दल अध्यक्षांकडून पारितोषिक
५.कार्योपाध्यक्ष श्री.रमाकांत विद्वांस यांचे हस्ते पुणे दैनंदिनी २००८ चे प्रकाशन.
६. प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांचे हस्ते संस्थापक श्री. वा.ग. मराठे यांच्या 'कृतज्ञ मी कृतार्थ मी' या आत्मकथनात्मक पुस्तकाचे प्रकाशन.
७. अमरावतीचे सदस्य श्री. संजय रामचंद्र मराठे ,मुख्यमंत्री मा. विलासराव देशमूख यांचे हस्ते शिवछत्रपती राज्य क्रीडा (जलतरण)पुरस्काराचा स्वीकार.
८ आपले नवीन अमेरिकन सदस्य श्री.रोहित अविनाश विद्वांस व सौ.रूपाली.(श्री.रोहित नुकतेच 'इन्टेल इंडिया बंगलोर'चे डायरेक्टर ऑफ इंजिनियरिंग झाले आहेत. वृत्त पृ. ५ वर पहा)

(वर्धापनदिन-पृ. १ वरून )
सुलभाताई मराठे यांचा सत्कार करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे पुण्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानची रोख पारितोषिके वितरित करण्यात आली. यामध्ये १० वीमध्ये ८१ टक्के गुण मिळवणारी कु. मृणाल मधुसूदन मराठे व ४ थीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत ९७ टक्के गुण मिळवणारी कु.सानिका विनोद जोशी विशेष उल्लेखनीय आहेत.

पुणे दैनंदिनी २००८च्या पुरेशा प्रती उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे सर्व उपस्थित सदस्यांना वितरित करता आल्या नाहीत. मात्र मुंबई-पुण्याबाहेरून आलेल्या मोजक्या सभासदांना त्या देण्यात आल्या. अन्य सर्व सदस्यांना नोंदणीनुसार लवकरच देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

यानंतर प्रमख वक्ते श्री. ह.मो. मराठे व श्री. भाऊ मराठे यांची श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकणारी व्याख्याने झाली. (सविस्तर तपशील पृ.१० व १२ पहा) तिसरे वक्ते श्री. गिरीश जाखोटिया हे राजस्थानमध्ये सत्कारासाठी गेले असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

यानंतर हितगुजच्या संपादिका डॉ.सौ. सुमेधा मराठे यांनी हितगुजच्या कार्यप्रणालीवर आपले विचार व्यक्त केले व हितगुज प्रसिद्धी व वितरण वेळेवर होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. त्यावर सहसंपादक श्री.खांबेटे यानी या बाबतीतील अडचणी लवकरच दूर होतील असे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे शेवटी गरमागरम मसालेभात जिलबीचा अल्पोपाहार आणि चहापान होऊन रंगतदार कार्यक्रमाची सांगता झाली.

-०-



मराठे प्रतिष्ठानच्या समस्त सदस्यांना नूतन 'सर्वधारी' नाम संवत्सर-शालिवाहन शक-१९३० साठी शुभेच्छा!!!

# प्रतिष्ठान वृत्त

### कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करावा म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

डिसेंबर२००७ ते फेब्रुवारी२००८ या तिमाहीत (१) दि. १०-१२-२००७, (२) दि.१२-०१-२००८ व (३)१६-२-२००८ अशा तीन सभा झाल्या. त्या सभांचा संक्षिप्त अहवाल येणेप्रमाणे:-

पहिली सभा दि. १०डिसेंबरला प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांच्या माहिमच्या निवासस्थानी झाली. कार्यकारिणीच्या सदस्य व अन्य निमंत्रित मिळून २० च्यावर उपस्थिती होती. जोगेश्वरी येथील कार्यकारिणीसदस्य श्री वा.ग.मराठे यांनी आपल्या आत्मचरित्रपर लिखित ‘ कृतज्ञ मी कृतार्थ मी’या पुस्तकाचे प्रकाशन श्रीमती सुलभाताई यांच्या शुभहस्ते करण्यात आले.योगायोग म्हणजे याच दिवशी ‘वा.ग.’यांचा वाढदिवस होता. लेखक श्री. ‘वा.ग.’व प्रकाशक श्री.सी.गो.खांबेटे यांचा या निमित्त यथोचित सत्कार करण्यात आला.

दुसरी सभा शनिवार दि. १२ जानेवारीला कार्योपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांच्या माहिम निवासस्थानी झाली. सभेला १२ च्या वर सदस्य उपस्थित होते. हितगुज सप्टेंबर हा ७५ वा अंक विशेषांक म्हणून किमान ७५ पानांचा काढावा असे सुचविण्यात आले. छपाई व टपाल-वितरण खर्चासाठी रु.५०,००० च्या जाहिराती मिळविण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. तसेच श्री.खांबेटे यांनी कुलवृत्तांताच्या प्रती शिल्लक नसल्यामुळे व नविनीकरणाची पूर्वतयारी म्हणून चालू आवृत्तीची सुमारे १००० पानांची केवळ डेटा एंट्री करून ठेवण्याची आवश्यकता प्रतिपादन केली व ही संगणकीय अक्षरजुळणी सदस्यांना डिस्कवर उपलब्ध करणे शक्य होईल असा प्रस्ताव मांडला. त्यावर तपशीलवार माहिती मिळवून योजना आखावी व निधीसाठी आवाहन करावे असे ठरले.

श्री.अरविंदरावांच्या मातोश्रींच्या शतक महोत्सवी सोहळ्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे

## या अंकात


| क्र. | विषय | लेखक | पृ. |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय भूमिका | डॉ. सुमेधा प्र.मराठे, वडाळा | १,२२ |
| २. | २८वा वर्धापनदिन व दैनंदिनी प्रकाशन | सौ. नीलांबरी मराठे, पुणे | १ |
| ३. | प्रतिष्ठान वृत्त | संपादक | ३,११ |
| ४. | या अंकात (अनुक्रमणिका) | सहसंपादक | ३ |
| ५. | बेवारस (कथा) | श्री. वि.म.मराठे,सांगली | ४-५,१७ |
| ६. | सभासदवृत्त: मानसन्मान | सहसंपादक | ५ |
| ७. | रिव्हर्स मॉर्टगेज गृहकर्ज योजना | श्री. सी.गो.खांबेटे, अंधेरी | ६-७ |
| ८. | माझ्या लग्नाची गोष्ट | सौ. राधा श्री.मराठे, पुणे | ८ |
| ९. | कुलवृत्तांताचा असाही उपयोग! | श्री. सी.गो.खांबेटे, अंधेरी | ८ |
| १० | साठा उत्तराची कहाणी | सौ. वृषाली वा. मराठे, जोगेश्वरी | ९ |
| ११. | नांवात काय आहे!!! | श्री. रमाकांत म. विद्वांस, माहीम | ९ |
| १२. | भाऊच्या धक्क्यावरून | श्री. सदानंद वि.(भाऊ)मराठे,दादर | १० |
| १३. | श्री.भाउसाहेब (वि.गो.)मराठे यांचे पत्र | | १० |
| १४. | प्रकाशझोत-सौ.कमला यशवंत जोशी, | डॉ. सौ.सुमेधा प्र. मराठे, वडाळा | ११ |
| १५ | कॉपॅक्ट डिस्क वर मराठे कुलवृत्तांत | श्री. सी.गो.खांबेटे, अंधेरी | ११ |
| १६. | आपले राजकीय नेते-मला भावलेले | श्री. ह.मो.मराठे, पुणे | १२ |
| १७. | ह.मो.मराठे- अल्प परिचय | सौ. नीलांबरी मराठे,पुणे | १२ |
| १८. | माहेरच्या अंगणात | सौ. रोहिणी विजय मराठे, पुणे | १३ |
| १९. | सभासदवृत्त: नांदा सौख्यभरे / सहवेदना | सहसंपादक | १३ |
| २०. | एक वही कवितेची:-जत्रा | श्रीमती सुनीती ज.मराठे,माटुंगा | १४ |
| | - चैत्रमासी देवी गौरी/माझी फुलबाग | श्रीमती सुधा गो.मराठे,भोपाळ | १४ |
| | - शासन हवे कुणाला/सुटका | श्री. वि.म.मराठे, सांगली | १५ |
| | - जागतिक चित्पावन महाधिवेशन | श्री. सतीश म.मराठे,डेरवण | १५ |
| | - वरमाईचा दिलासा | श्रीमती सुनीता सु.गोखले,पुणे | १५ |
| २१ | स्वामी समर्थ रामदासांची कृष्णभक्ती | डॉ. सुमेधा प्र.मराठे, वडाळा | १६-१७ |
| २२. | चिं.ब.मराठे निबंध स्पर्धा २००८:निकाल | श्री. गजानन चिं.मराठे, पुणे | १७ |
| २३. | फॅमिली डॉक्टर(वैद्यकीय व्यवसाय)-की धंदा? | डॉ. मधुसूदन पु. विद्वांस,दादर | १८-२० |
| २४. | सदस्य-संवाद | श्री. सी गो खांबेटे, अंधेरी | २० |
| २५. | आठवणीतली ताई | श्री. अरविंद दा.मराठे,डोंबिवली | २१ |
| २६. | अभीष्ट चिंतन-नाबाद १००! | डॉ. सौ.सुमेधा प्र.मराठे,वडाळा | २३ |


डिसेंबर ते फेब्रुवारी २००८ या सहामाहीत प्रतिष्ठानला प्राप्त रकमांचा तपशील.

| पावती.क्र. | देणगीदार | | हेतू | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| मुं. १६९० | श्री. राजेंद्र जयंत मराठे (पृ. १८० ) | माटुंगा | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| मुं. १६९१ | श्री.दिनकर रामचंद्र मराठे (पृ.१६९ ) | गिरगांव | हितगुज निधी | २५० |
| मुं. १६९२ | श्री.मोहन विष्णुपंत मराठे (पृ. ४२२ ) | वडोदरा | दैनंदिनी पृष्ठदान | ३०० |
| मुं. १६९३ | किलोस्कर न्युमॅटिक कं. लि. | पुणे | बॅनर डिस्प्ले (वर्धापन दिन) | ३००० |
| मुं. १६९४ | श्री.विनोद अरुण मराठे (पृ. ३७३ ) | अमरावती | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| मुं. १६९५ | श्री.राहुल रविंद्र विद्वांस (पृ.६४९ ) | कल्याण | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| मुं. १६९६ | श्री.राहुल रविंद्र विद्वांस (पृ.६४९ ) | कल्याण | पुणे दैनंदिनी विक्री | १०० |
| मुं. १६९७ | श्री.अरुण नारायण मराठे (पृ. ? ) | परळ | पुणे दैनंदिनी विक्री | १०० |
| मुं. १६९८ | श्री.गणेश त्र्यंबक मराठे (पृ. १७४) | बोरिवली | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| मुं. १६९९ | सौ. अर्चना गणेश मराठे (पृ.१७४) | बोरिवली | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| मुं. १७०० | श्री.अशोक विश्वनाथ मराठे (पृ.१७५) | डोंबिवली | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| मुं. २४५१ | श्री.सौ.सुप्रिया अशोक मराठे (पृ.१७५ ) | दादर | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| मुं. २४५२ | श्री.अशोक मनोहर मराठे (पृ.१७५ ) | दादर | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| मुं. २४५३ | श्री.दत्तात्रेय आ. मराठे (पृ.३२६ ) | मुलुंड | हितगुज निधी | ५१ |
| मुं. २४५४ | श्री.केदार सखाराम मराठे (पृ.५५७) | शीव | हितचिंतक सदस्य शुल्क | ५०० |
| मुं. २४५५ | मे.ग्रेट आऊटडोअर्स | दादर/ठाणे | हितगुज जाहिरात | १००० |
| मु. २४५८ | डॉ.सौ.माधवी संदीप जेस्ते (पृ.६५३ ) | दादर | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |

# बेवारस

वि.म.मराठे (पृ.२३५) पद्मश्री, विश्रामबाग, सांगली ४१६४१५; दूरध्वनीः (०२३३) २३०००७२

दिवस उजाडला होता आमची गाडी मिरज स्टेशनमधे शिरत होती. आम्ही खाली उतरण्याच्या तयारीने सर्व सामानाचे डाग दरवाजाजवळच्या पॅसेजमध्ये आणून ठेवले. स्टेशन येताच हमाल मंडळींनी चालत्या गाडीत चढून डब्याचा ताबा घेतला होता. सर्व सामान खाली उतरविल्याशिवाय हमाल वगैरे ठरवायचा नाही असे आम्ही ठरविले होते. आम्ही एक एक करून सर्व सामान उतरवून घेतले. प्लॅटफॉर्मवरील एका खांबाला टेकवून सर्व सामान ठेवले आणि डागांची मोजणी केली. परंतु एकूण हिशेब जमत नव्हता. पुन्हा पुन्हा मोजूनही एक डाग कमी आलेला दिसत होता. परत डब्यात चढून, पॅसेजमध्ये, आमच्या सीटखाली व कंपार्टमेंटमध्ये पाहूनही तो डाग सापडत नव्हता. आता एकतर तो डाग डब्यातून चोरीला गेला अगर पुण्यामध्ये डब्यात चढताना घ्यावयाचा राहिला एवढीच शक्यता होती. एक डाग कमी होता खरा. पण तो कोणता ते माझ्या काही लक्षात येत नव्हते. म्हणून मी सौ. मीनाला विचारले तेव्हा ती म्हणाली,'' अहो, एवढे कसे लक्षात नाही! ज्या डब्याबद्दल काल घरातून निघताना आपला वाद झाला तो पिशवीत बांधलेला घट्ट झाकणाचा डबा!''

''तो होय, तो तर भाजणीचा डबा होता ना? मग गेला तर जाऊ दे. भाजणी काय मिरजेत घेता येईल ना.'' मी म्हणालो. त्यावर ''अहो, तो नुसता भाजणीचा डबा नव्हता काही!'' आणि तिने आजूबाजूला बघत माझ्या कानात जे वाक्य उच्चारले ते माझ्या कानात शिरताच मी ताडकन उडालो व 'त्या' डब्याच्या शोधार्थ ताबडतोब पुण्याला जाण्याचा निर्णय घेतला. आणि योगायोग असा की दोन तीन प्लॅटफॉर्म सोडून पुण्याला जाणारी गाडी सुटण्याच्या बेतात असलेली दिसली. मी पाकिटातली रक्कम मोजली आणि तिकडे धावत सुटलो.

दोन तीन प्लॅटफॉर्म पलीकडील पुण्याला जाणारी गाडी पकडण्यासाठी मी दोन जिने धापा टाकीत पार केले आणि अगदी सुटण्याच्या बेतात असलेल्या गाडीत उडी मारली. दरवाजा जवळच्या पॅसेजमधे उभा राहून कपाळावरचा घाम पुसला, चेहऱ्यावर वॉश बेसिनमधील पाण्याचा शिडकावा मारला व दीर्घ श्वास घेत मध्ये डोकावून कुठे बसावयाला जागा मिळते का याचा शोध घेऊ लागलो. सर्व कंपार्टमेंट पूर्ण भरली होती. मधल्या कंपार्टमेंटमधील एका बाकावर कोपऱ्यावर थोडी रिकामी जागा होती तेथे टेकलो. नुकताच प्रवासातून आल्यामुळे माझे केस व कपडे विस्कटलेले होते. एकूण अवतार बघण्यासारखा झाला होता. प्रवासात असूनही माझ्याजवळ कोणतेही सामान नव्हते. माझ्या अवतारावरुन मी एक पांढरपेशा सज्जन माणूस आहे हे कोणालाही खरे वाटले नसते. डब्यातील प्रत्येक जण 'पळत पळत गाडी पकडणारा हा कोण आहे' अशा संशयी नजरेने बघत होता. त्यांचे असे बघणे योग्यच होता. मी त्यांच्या ठिकाणी असतो तर अशा अवतारात रिकाम्या हातांनी पळत पळत येऊन गाडी पकडणाऱ्या माणसाबद्दल तो कोणी लफंगा तर नाही ना असेच म्हणालो असतो.

गाडीने आता वेग घेतला होता. एक एक स्टेशन मागे टाकीत ती पुढे निघाली होती. दोन तीन स्टेशने गेल्यावर मी डब्यातील वातावरणात रुळलो व जरा सरकून जास्त जागेवर बसलो. माझ्या कंपार्टमेंटमध्ये माझ्या शेजारी एक मध्यमवयीन जोडपे व त्यांच्या पलीकडे दोन महिला होत्या. समोरच्या बाकावर दोन व्यापारी व दोन कानडी भाषिक स्त्रिया बसल्या होत्या.

मी डब्यात नवखा होतो. शांतपणे डोळे मिटून बसलो होतो. एवढ्यात अचानक शेजारच्या गृहस्थाने ''तुम्ही एवढी पळत पळत गाडी पकडलीत. जरा पाय घसरला असता तर केवढा धोका झाला असता! कोठे पुण्याला जाणार आहात काय? तेथे काही अर्जंट काम आहे का?'' अशी सुरुवात करून माझी चौकशी सुरू केली. माझ्या तंद्रीतून मी जागा झालो. ''मला पुण्याला जायचे आहे. गाडी पकडण्यास जरा उशीर झाला, त्यामुळे जरा गडबड झाली. पण मला जाणे जरुरीचेच आहे. त्यामुळे जरासा धोका पत्करून मी गाडी पकडली'', मी उत्तर दिले.

''तुमच्याजवळ सामान वगैरे नाही. तुमच्या बरोबरचे आणखी कुणी दुसऱ्याडब्यात चढले आहे का?'' माझ्या पहिल्या उत्तराने पुरेसे समाधान न झाल्याने त्यांनी पुढील प्रश्न केला.

''नाही . माझ्याबरोबर दुसरे कोणी नाही. मी एकटाच आहे. माझे काम आटोपून मी लगेच परत येणार आहे'', मी उत्तर दिले. तेवढ्यात समोरच्या बाकावरून व्यापाऱ्याने, ''आम्ही चौकशी करतो त्याचा राग मानू नका हं साहेब. हल्ली कोण कसा आहे, समजत नाही म्हणून चौकशी केलेली बरे असते. हल्ली म्हणे चोर लोक स्टार्टिंग स्टेशनवरच गिऱ्हाईक हेरतात. त्यांचे म्हणे बीट ठरलेले असतात. त्यांच्या बीटमध्ये त्यांना काम करण्यात यश आले नाही तर ते गिऱ्हाईक पुढील बीटवाल्याला हँड ओव्हर करतात म्हणे! व नंतर सर्वजण चोरीचा माल वाटून घेतात आणि मिरज म्हणे या उद्योगाचे मोठे केंद्र आहे!'' त्याच्या या म्हणण्यास डब्यातील सर्वांनी दुजोरा दिला.

''आणि अनोळखी व्यक्ती अतिरेकीहि असू शकतात असे सरकार नेहमी जाहीर करीत असते. तेंव्हा एकमेकांची ओळख करुन घेतलेली बरी, हो ना?'' त्यांचे एवढे सगळे ऐकल्यावर मी त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला व त्यानी माझी चौकशी केली याबद्दल राग आला नसल्याचे सांगितले. एवढ्या चर्चेनंतर मला माझी ओळख करून देणे जरूरीचे वाटले. मी माझ्या पाकिटातून माझ्या सरकारी कार्याचे ओळखपत्र बाहेर काढले व मी एक सरकारी अधिकारी असल्याचे सांगत ओळखपत्र त्यांचेपुढे धरले.

''असू दे, असु दे हो, त्याची काही जरुरी नाही,'' असे शेजारचे गृहस्थ म्हणाले. आता कोणाला माझ्याविषयी शंका राहिली नव्हती. तरी पण, ''मी अर्ध्या तासापूर्वीच पुण्याहून आलो आहे व अचानक एक महत्त्वाचे काम, जे मी गेल्याशिवाय होणार नाही, ते लक्ष्यात आल्यामुळे मी आता परत तिकडे निघालो आहे. तेवढे काम करून मी लगेच परत येणार आहे'' एवढा खुलासा करून टाकला. त्यावर कोणी काही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही व ते सर्वजण आपसात गप्पा मारण्यात रमून गेले.

गाडीच्या आवाजाने लय पकडली होती आणि त्या लयीबरोबर माझ्या मनात कालपासून घडलेल्या घटनांची उजळणी सुरू होती...

ऑफिसला दोन दिवस सलग सुट्टी होती. तिला जोडून दोन दिवस रजा घेतली की सबंध आठवडा पदरात पडणार होता. त्यामुळे सुट्टीत चार पाच दिवसाची एक छानशी ट्रिप करण्याचे मी योजिले होते. परंतु तसे होणे नव्हते. नेमकी ही सुट्ट्यांची संधी साधून मीनाच्या म्हणजे बायकोच्या माहेरच्यांनी तिच्या भावजयीची मंगळागौर करण्याचे ठरविले. व तसा फोन आला. अगोदरच सुट्टी व त्यात माहेरी कार्यक्रम म्हटल्यावर आमच्या घरात दसरा-दिवाळीच्या सणासारखा आनंदोत्सव सुरू झाला. कधी

जायचे, काय काय बरोबर न्यायचे याची आखणी सुरु झाली. मंगळागौरीला जायचे आहे म्हणून चिवडा, लाडू इ. पराळाचे पदार्थ तयार झाले. आईसाठी म्हणून घातलेल्या लोणच्याच्या व मोरावळ्यांच्या बरण्यांपासून आईला(तिच्या) आपल्याकडील भाजणी खूप आवडते म्हणून घट्ट झाकणाचा स्टीलचा डबा जेव्हा तिने बरोबर न्यायच्या सामानाच्या ढिगात जमा केला तेव्हा त्याबद्दल नाराजी व्यक्त केली. 'कम सामान बहुत आराम' हा मंत्र पण तिला सांगून बघितला. परंतु ती ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. आमच्याकडील भाजणी चितळेंच्या थोबाडीत मारते असे तिच्या आईचे म्हणणे असल्यामुळे तो डबा बरोबर घेणे भागच होते. या सामानाबरोबरच दोघांच्या सूटकेसेस व इतर सामान असे सहासात डाग घेऊन आम्ही स्टेशन गाठले होते. रिजर्वेशन नव्हतेच त्यामुळे समोर येईल त्या डब्यात घुसायचे असे ठरवून प्लॅटफार्मवरील एका कोपऱ्यात गाडीची वाट बघत बसलो व गाडी येताच कसेबसे आत घुसून जागा मिळविण्यात यशस्वी झालो. अधूनमधून डुलक्या घेत रात्रीचा प्रवास करून मिरजेला उतरलो. उतरलो खरा! पण तो एक डाग कमी असल्याचे सांगून पत्नीने मला जो धक्का दिला तो मी थेट उलट्या प्रवासास लागलो.

मी परत निघालो होतो खरा, पण एकूण हा टू अँड फ्रो प्रवास करून मी पुण्याला पोहोचेपर्यंत ८-१० तास जाणार होते. आणि या दीर्घ कालावधीनंतर तो डबा सापडेल का? नाही सापडला तर काय करायचे, लॉस्ट अँड फाऊंड ऑफिसमध्ये कोणी तो जमा केला असेल का, आणि सापडलेली वस्तु परत करण्याचा प्रामाणिकपणा कोण दाखवेल का अशा विचारांची साखळी माझ्या मनात सुरू असतानाच गाडी पुणे स्टेशनात शिरत होती.

चटकन उतरून डब्याच्या शोधात धावायचे म्हणून मी दरवाजात उभा राहिलो. माझी नजर प्लॅटफॉर्मवर डबा शोधीत होती आणि गाडी थांबता थांबता तो डबा जेथल्या तेथे असलेला माझ्या नजरेस पडला. माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. मी पळत पळत जाऊन तो प्लॅटफार्म गाठला. 'अफवांवर विश्वास ठेऊ नका. बेवारस वस्तूस हात लावू नका' अशा सूचना ध्वनिसंपर्कावरुन सुरू होत्या. त्या सूचनांची (पुढील मजकूर पृ. १७ वर)

## सभासदवृत्तः मान सन्मान

१. कु. चैत्रा माधव मराठे हिला कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीची पी.एच.डी.

प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य आणि कुलवृत्तांत आवृत्ती २ चे संपादक श्री. वि.गो. तथा भाऊसाहेब मराठे व सौ. मालतीताई आता अमेरिकेत स्थायिक झाले आहेत हे आपणास माहित आहेच. कु. चैत्रा ही त्यांची नात आणि सौ.मीनाक्षी व श्री. माधव विनायक मराठे (पृ. ६९) यांची ज्येष्ठ मुलगी. कु. चैत्रा हिने अलिकडेच युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाच्या लॉस एंजलीस (UCLA) येथील आस्थापनेमधून मॉलिक्युलर बायॉलॉजी या विषयांतील संशोधनासाठी पी.एच.डी. ही पदवी संपादन केली आहे. तिने यापूर्वी याच विषयात सॅनडियागो आस्थापनेमधून बॅचलरची डिग्री मिळविली होती.

२. कु.नेहा मुकुंद मराठे कॅलिफोर्निया 'बार'एक्झॅमिनेशन ही कठीण परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण.

कु. नेहा (वरील श्री. भाऊसाहेब मराठे यांची दुसरी नात आणि सौ. रेखा व श्री. मुकुंद विनायक मराठे यांची कन्या) हिने युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कली, येथून पॉलिटिकल सायन्स मध्ये बी.ए. केल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण कायद्याच्या विषयात केले आणि वेगळ्या वाटेवरची जे.डी. (डॉक्टर ऑफ जूरिस्प्रूडन्स) ही पदवी मिळविली. तसेच वरील 'बार' ची परीक्षा दिल्यामुळे कु. नेहा ही आता पूर्णपणे 'अटर्नी ' झाली आहे.

श्री. भाऊसाहेबांच्या या दोन्ही नातींचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन!

३. अमरावतीचे प्रा.श्री.संजय मराठे यांना सर्वोत्कृष्ट क्रीडा कार्यकर्ते पुरस्कार मुख्यमंत्र्यांचे हस्ते प्रदान

२००५-६च्या महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराचे वितरण बुधवार दि. २९ ऑगष्ट २००७ रोजी लातूर येथे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमूख यांच्या हस्ते करण्यात आले. अमरावती येथील सुप्रसिद्ध श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रा.श्री. संजय रामचंद्र मराठे (पृ.४१६) यांना मिळालेल्या वरील पुरस्काराचे स्मृतिचिह्न, प्रमाणपत्र व रोख रु. ५०००० असे स्वरूप होते. प्रा. संजय हे मंडळाच्या डिग्री कॉलेजचे प्राध्यापक, जलतरण वर्गांचे आयोजक व 'जलतरण प्रबोधन' या पुस्तकाचे लेखक आहेत. त्यांच्या या यशाबद्दल प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन! (पुरस्कार स्वीकाराचे छायाचित्र पृ.२/७) -०-



४.रोहित विद्वांस यांचे इंटेल इंडिया,बंगळूरू,येथे पदोन्नतीने डायरेक्टर ऑफ इंजिनियरिंग या पदावर मायदेशी पुनरागमन

प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष श्री रमाकांत विद्वांस यांचे पुतणे श्री.रोहित अविनाश विद्वांस (पृ.६२३) हे इंटेल कॉर्पोरेशन, पोर्टलँड, ओरेगॉन, यू एस ए येथे चीफ इंजिनियर या पदावर गेली अनेक वर्षे कार्यरत होते. अलिकडेच त्याना पदोन्नति मिळून ते इंटेल इंडिया, बंगळूरू येथे डायरेक्टर ऑफ इंजिनियर या पदावर रुजू झाले आहेत. या नव्या ठिकाणी त्यांचे हाताखाली ४०० इंजिनियर्सची टीम असणार आहे. श्री रोहित यांच्या यानिमित्त स्वदेश पुनरागमनासाठी प्रतिष्ठानतर्फे स्वागत आणि शुभेच्छा. (श्री. रोहितने सौ.रूपालीसह अमेरिकेतून पाठविलेले सुंदर छायाचित्र पृ.२ वर पहा)

५. डॉ.सौ.सीमा मराठे यांचे १५ वे पुस्तक प्रकाशित

मिरज येथे झालेल्या डॉक्टरांच्या स्नेह संमेलनामध्ये डॉ. सीमा मराठे (पृ. )यांनी लिहिलेल्या 'योगवासिष्टातील निवडक कथा व उपदेशामृत (अतिसंक्षिप्त रूपात)' या पुस्तकाचे डॉ. करमरकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. डॉ. सीमाताईंचे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन!

-०-



६.कोकणविषयी लेखनासाठी 'कोकणश्रीवैभव' पुरस्कार- मानकरी श्रीधर मराठे,वेंगुर्ले. दूरध्वनी(०२३६६)२६२४४५

e-mail: kiratsaptahik@rediffmail.com

वेंगुर्ले येथील साप्ताहिक 'किरात' चे संपादक श्री. श्रीधर केशव मराठे (पृ.३१६) याना मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे दि. ६ जानेवारीला पत्रकार दिनी दैनिक केसरीचे संपादक डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. किरातकारांचे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन!

साप्ताहिक किरात आता नेटवर पहा
**www.kiratsaptahik.com**

-०-



# रिव्हर्स मॉर्ट्गेज गृहकर्ज योजना

## -असहाय ज्येष्ठ नागरिकाना वरदान

-सी. गो. खांबेटे, ए-१३, संपदा सो., स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-६९
दूरध्वनी : (०२०) २६८३६९१४ E-mail: sitaram_khambete@yahoo.com

अमेरिका, युरोप या ठिकाणी यापूर्वीच प्रचलित असणारी आणि आता आपल्या देशात प्रस्तावित असलेली रिव्हर्स मॉर्टगेज कर्ज योजना सध्या जोरात चर्चेत असून ज्येष्ठ नागरिक या योजनेच्या प्रतीक्षेत आहेत. घरकर्ज, वाहनकर्ज, गृहोपयोगी वस्तू खरेदीसाठी, अशा विविध कर्ज योजना वैयक्तिक कर्जदारांसाठी उपलब्ध आहेत. त्या मध्ये कर्ज-रक्कम, तारण, मुदत, व्याजदर आणि मासिक कर्ज परतफेड हप्ते या बाबींचा अंतर्भाव असतो; परंतु प्रस्तावित रिव्हर्स मॉर्टगेज कर्ज योजनेत कर्जदाराने कर्जाची सव्याज परतफेड करणे अपेक्षित नसल्यामुळे ही योजना अनन्यसाधारण म्हणावी लागेल. आणि त्यामुळे या कर्ज योजनेविषयी सर्वसामान्य लोकांच्या विशेषतः ज्येष्ठ नागरिकांच्या मनात कुतूहल निर्माण झालेले आहे.

ज्यांना निवृत्तीनंतर मिळणारी पेन्शन रक्कम अत्यल्प आहे आणि या ना त्या कारणाने दैनंदिन चरितार्थ चालविणे मुश्कील झाले आहे अशा ज्येष्ठ नागरिकांना ही योजना म्हणजे लॉटरी, वरदान, कामधेनू,आहे असे गुलाबी चित्र उभे करून ग्राहकांना खेचून घेण्यात आपल्या देशातील(व पुढेमागे कदाचित परदेशी वित्तसंस्थासुद्धा) बँकामध्ये स्पर्धा होऊन वरकरणी ही योजना आकर्षक वाटली तरी त्यातील अडीअडचणी दूर झाल्या नाहीत तर ती ज्येष्ठांसाठी मृगजळ ठरेल. मात्र पूर्वीप्रमाणे गरिबीत जगून श्रीमंतीत मरणे *'live poor to die rich'* याऐवजी श्रीमंतीत जगून गरीब म्हणून मरणे *'live rich to die poor'* पसंत करण्याच्या आजच्या जमान्यात या योजनेचा फायदा घेण्याची प्रवृत्ती वाढीस लागणे सहज शक्य आहे.

मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक श्री. वा.ग.मराठे व हितगुजचे सहसंपादक श्री. सी.गो.खांबेटे यांनी *'dignity dialogue'* या ज्येष्ठांसाठीच्या नियतकालिकासाठी काही वर्षापूर्वी या विषयाचा पाठपुरावा केला होता. अलिकडे प्रसिद्ध झालेल्या नवीन माहितीवर आधारित हा विस्तृत लेख सदस्यांच्या माहितीसाठी

आयुष्यभर कुटुंबाचा चरितार्थ इमाने इतबारे नोकरीधंदा करून समर्थपणे चालवून आपले निवृत्तीनंतरचे आयुष्य सुखासमाधानाने व्यतीत करता यावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते. म्हातारपणाची काठी म्हणून सांठविलेल्या धनावरचे व्याज आणि हक्काचा निवारा म्हणून तरुणपणात (बहुधा हप्त्याने) खरेदी केलेले मालकीचे एखादे घर असले की म्हातारपण सुखाने जाईल असे साधे सोपे गणित असते.

परंतु कुटुंबीयांच्या पालनपोषणासाठी, शिक्षणासाठी, लग्नप्रसंगी, किंवा मदत म्हणून वेळोवेळी केलेला खर्च आणि नित्याचे व आकस्मिक खर्च, तसेच वयोमानानुसार वाढता वैद्यकीय खर्च व राहणीमानाचा दर्जा (स्टेटस) सांभाळण्यासाठीचा खर्च यामुळे काहीतरी गफलत होते आणि नोकरीधंद्यातून निवृत्त झाल्यावर विशेषतः पेंशनसारखी काही व्यवस्था नसल्यास दुसऱ्याकडे हात पसरण्याची नामुष्की पदरी येते.

अशा वेळी नातेवाईक टाळाटाळ करतातच पण आपल्या संपत्तीचे कायदेशीर वारसदार असलेली मुलेसुद्धा आपल्या उत्पन्नातून ठराविक हिस्सा आई वडिलांसाठी खर्च करणे हे आपले कर्तव्य सोयिस्करपणे विसरतात; किंवा त्यांच्या आपणच उंचावलेल्या आधुनिक आर्थिक गरजा व त्यांना मिळणारे उत्पन्न यांचा मेळ घालणे अवघड झाल्यामुळे इच्छा असूनही त्यांना ते शक्य होत नाही. एकत्र कुटुंबपद्धती जाऊन विभक्त कुटुंबे निर्माण होऊ लागल्यामुळे ही परिस्थिती आता अधिकच बिकट व थोड्याफार फरकाने सार्वत्रिक होऊ पहात आहे हीच खरी शोकांतिका आहे.

वित्तमंत्रालयाने यावर्षीच्या अंदाज पत्रकामध्ये प्रस्तुत केलेली रिव्हर्स मॉर्टगेज योजना अशा लाचार व निराधार वृद्धांना सन्मानाने व आत्मनिर्भरतेने उर्वरित आयुष्य जगण्याची हमी देणारी म्हणून वरदानच ठरेल. यासाठी अट इतकीच की तुमच्या जवळ तुमची स्वतःच्या कमाईची वास्तु हवी आणि तिच्या बाजारभावानुसार ठरलेल्या किंमतीवर आधारित कर्ज मासिक पेंशनच्या स्वरूपात मिळण्यासाठी ती गहाण ठेवण्याची मनाची तयारी हवी. म्हणजे तुमच्या आणि तुमच्या जोडीदाराच्या उर्वरित आयुष्यात किमान १५ वर्षेपर्यंत न कोणी परतफेडीचा तगादा लावणार न व्याज वगैरेची मागणी करून तुम्हाला अपमानित करणार. उचललेले कर्ज नियमित मासिक हप्त्याने मिळणार असल्यामुळे व तुमच्या दैनंदिन खर्चाची हमखास तरतूद झाल्यामुळे सुरुवातीला वर्णन केलेल्या प्रसंगी कोणापुढेही हात पसरावे लागणार नाहीत. कारण तुमची अनुत्पादक अचल संपत्ती (illiquid fixed asset) आता उत्पादक (cash generating) बनलेली असते.

रिव्हर्स मॉर्ट्गेज गृहकर्ज ही योजना अमेरिका व युरोपीय देशात पूर्वीपासून अमलात असून ज्येष्ठ नागरिकांना ती सोयीची असल्यामुळे बऱ्याचशा ज्येष्ठ नागरिकांनी त्याचा फायदा घेऊन स्वतःचे जीवन सुखकारक केले आहे. अशा रितीने तेथे ती खूपच लोकप्रिय झाली आहे. या योजनेचा थोडक्यात तपशील असा आहे.

### अंमलबजावणी :

अर्थ मंत्रालयाकडून मान्यता मिळालेली ही योजना नॅशनल हाऊसिंग बँकेमार्फत रिफायनान्सपात्र असून सध्या पंजाब, अलाहाबाद, बरोडा, इंडियन व स्टेट या ५ सरकारी बँका, व दिवाण हाउसिंग या कंपनीने या योजनेला सुरुवात केली आहे. कालांतराने अधिकाधिक बँकांचा सहभाग अपेक्षित आहे.

### मॉर्टगेज विरुद्ध रिव्हर्स मॉर्ट्गेजः

उमेदीच्या काळात वित्तसंस्थेकडे घराचे मॉर्टगेज करून (गहाण ठेऊन) दीर्घमुदतीचे गृहकर्ज घेतल्यानंतर त्या रकमेची परतफेड सामान्यतः मासिक हप्त्याने करण्यात येते. हे हप्ते कर्जदार कर्जफेडीसाठी म्हणून वित्त संस्थेला देऊ शकेल हे सुनिश्चित करूनच कर्ज मंजूर केले जाते. त्यामुळे तो नोकरीत आहे वा त्याला नियमित उत्पन्न आहे याची खातरजमा त्याचे पगारपत्रक पाहून केली जाते. काहीवेळा बँका जामिनदाराची सुद्धा मागणी करतात. रिव्हर्स मॉर्ट्गेजमध्ये परिस्थिती याच्या एकदम उलट असते. बँक कर्जदाराचे घर गहाण ठेवून दरमहा ठराविक रक्कम कर्जदाराला देते. त्या रकमेची किंवा त्यावरील व्याजाची परतफेड कर्जदारांनी करावयाची नसते. त्यामुळे त्याचे उत्पन्न तपासावे लागत नाही. त्या कर्जाची परतफेड कर्जदाराच्या पश्चात होते. वारसाला कर्जफेडीची संधी दिली जाते अथवा गहाण ठेवलेले घर विकून त्या रकमेतून कर्जाची सव्याज परतफेड केली जाते. ही कल्पनाच नेहमीच्या मॉर्ट्गेज पेक्षा अगदी भिन्न असल्यामुळे याला रिव्हर्स मॉर्ट्गेज असे संबोधिले

आहे. थोडक्यात, नेहमीच्या मॉर्ट्‌गेजमध्ये कर्जदार परतफेडीसाठी म्हणून वित्तसंस्थेला दरमहा रक्कम ( EMI ) परत करतो. उलट रिव्हर्स मॉर्ट्‌गेज मध्ये बँक कर्जदाराला दरमहा (अथवा त्याच्या गरजेप्रमाणे) कर्जाचा हप्ता देऊन त्याची आर्थिक गरज भागविते.

योजनेचा उद्देश:

ज्येष्ठ नागरिकांना निरनिराळ्या समस्यांना सामोरे जावे लागते. निरनिराळ्या समस्यांमधील मोठी समस्या म्हणजे 'आर्थिक टंचाई'. ज्या ज्येष्ठ नागरिकांना दरमहा पेन्शन मिळत नाही अशा नागरिकांना तर आर्थिक टंचाई जास्तच जाणवते. त्यातच जर मोठ्या आजाराने ग्रासले तर औषध पाण्याचा खर्च अतोनात असल्यामुळे आर्थिक टंचाईला कसे सामोरे जावे हे एक मोठे आव्हानच ठरते. घर दुरुस्ती, नूतनीकरण, रंगरंगोटीसारख्या अचानक निर्माण झालेल्या पण आवश्यक खर्चाची गरज अशा आर्थिक टंचाईला रिव्हर्स मॉर्टगेज हे एकमेव उत्तर राहणार आहे. सामान्यतः स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा सर्वत्र असल्यामुळे आणि तिच्या अटी व नियम तूर्तास अधिक लाभकारी वाटल्यामुळे स्टेट बँक योजना समोर ठेऊन माहिती दिली आहे. काही काळाने अधिकाधिक बँका पुढे येतील तेव्हा तौलनिक अभ्यास करून बँकेची निवड करणे सोयीचे होईल.

योजनेच्या अटी :

१) इच्छुक कर्जदार ज्येष्ठ नागरिक असून वय ६० च्या वर असावे.

२) घर /प्लॅट स्वतःच्या मालकीचे असावे (वडिलोपार्जित वा समाईक मालकीचे नसावे) व त्यावर कोणताही बोजा नसावा. म्हणजेच घराचे टायटल क्लिअर (Title Clear) असावयास हवे. पूर्वीचे कर्ज बाकी असल्यास ते अगोदर फेडण्याची व्यवस्था करावी. या बाबतीतही बँकेची मदत घेणे शक्य आहे.

३) इच्छुक कर्जदार घरात स्वतः राहात असणे आवश्यक आहे.(म्हणजे ते दुसऱ्या कोणाला भाडेकराराने राहावयास दिलेले नसावे.)

४) साधारणतः घराच्या किमतीच्या (Market Value) ठराविक टक्के रक्कम कर्जयोग्य असेल. हे कर्जयोग्यतेचे (Loan eligibility) प्रमाण बँकानुसार ९० ते ४० असू शकते. (स्टेट बँक- ९० टक्के)

५) कर्जाची मुदत १५ वर्षे असेल. थोडक्यात, ६२ व्या वर्षी कर्ज घेतले तर वयाच्या ७७व्या वर्षापर्यंत ज्येष्ठ नागरिकाला या योजने अंतर्गत दरमहा ठराविक रक्कम मिळणार आहे.

६) या कर्जाची परतफेड कर्जदार वा त्याच्या जोडीदारास (पत्नी वा पती) त्याच्या हयातीत करावी लागणार नाही. त्याच्या पश्चात बँक कर्जाची संपूर्ण रक्कम नामनिर्देशित वारसाला फेडण्याची संधी देईल व घर वारसास परत करील. मात्र ही बाकी रक्कम वारसाने न फेडल्यास बँक ते घर विकून आपली कर्जवसुली करेल व राहिलेली रक्कम वारसांना वितरित करेल.

योजनेचे फायदे:

१) ज्येष्ठ नागरिकाला हे पैसे दरमहा मिळणार असल्यामुळे एकप्रकारे त्याला नवीन पगार सुरू होणार आहे.

२) ज्येष्ठ नागरिकास काही मोठा आजार अथवा आणखी काही अडचणींसाठी पैसे हवे असल्यास या योजनेअंतर्गत त्याला पैसे उभे करण्याची सुविधा मिळणार आहे.

३) कित्येक नागरिकांनी मेडिक्लेम पॉलिसी घेतलेली नसते अथवा घेतली असल्यास ती अपुरी असते व सहजगत्या वाढवून मिळत नाही. अशा वेळी या योजनेंतर्गत कर्ज म्हणून पैसे देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे, जेणेकरून ज्येष्ठ नागरिक चांगली मेडिकल ट्रिटमेंट घेण्यापासून वंचित राहणार नाही.

४) ज्या ज्येष्ठ नागरिकांना रोख नियमित उत्पन्नाची सोय अपुरी आहे त्यांना या योजने मुळे पूरक उत्पन्नाची 'supplementary income' सोय झाल्यामुळे चांगले जीवन जगणे शक्य होईल. शिवाय हे उत्पन्न वित्तमंत्र्यांनी करमुक्त केले आहे.

५) कर्जाची परतफेड आपल्या हयातीत अपेक्षित नसल्यामुळे कर्जदार तणावमुक्त जीवन जगू शकेल.

६) मिळालेली रक्कम ज्येष्ठ नागरिक त्याच्या गरजेनुसार वापरू शकणार आहे. तसेच आर्थिक कारणासाठी त्याला आपल्या मुलांवर अवलंबून राहावे लागणार नाही. थोडक्यात, तो ज्येष्ठ नागरिक त्याचे उर्वरित आयुष्य मानाने जगू शकणार आहे.

७) ज्येष्ठ नागरिकाने घर जरी बँकेकडे गहाण असले तरी तो स्वतःच्या घरात कायम राहू शकणार असल्यामुळे त्याला आपोआपच भावनिक आधार मिळणार आहे.

योजनेच्या मर्यादा:

१) घर गहाण ठेऊन आपण कर्ज निर्माण करणे व आपल्या पश्चात आपल्या वारसदार प्रियजनांना ते सव्याज फेडावयास लावणे हा आत्मकेंद्री विचार भारतीयांच्या भावनाप्रधान मनोवृत्तीला सहजी गळी उतरणारा नाही. किंबहुना वयोमानानुसार आपल्या गरजा कमी करून घराची मालकी अबाधित ठेवणे हाच पुरुषार्थ मानण्याची सामान्य प्रवृत्ती असते.

२) मुलगा (वंशाचा दिवा म्हणून) किंवा आता मुलगीसुद्धा कायदेशीरपणे घराचे हक्कदार असल्यामुळे ज्येष्ठांच्या निर्वाहाची नैतिक जबाबदारी अजूनही मानतात. कर्जबाजारी मातापित्यांबद्दल मुलांमध्ये तुटकपणाची वा तुच्छतेची भावना निर्माण होण्यास आपणहून कारण होणे कुणालाही सहसा मान्य होणारे नाही.

३) ही योजना सामाजिक न्यायाधारित मानून व्याजदरात (सध्याचा दर १०.७५ टक्के),व्याज आकारणीच्या पद्धतीत (चक्रवाढ ऐवजी सरळव्याज), गहाण दस्तावेज नोंदणी खर्चात, व अन्य चार्जेस इत्यादी मध्ये पुढे मागे सवलत मिळणे आवश्यक व शक्य आहे. आज मात्र या सवलती नसल्यामुळे मिळणारी मासिक रक्कम कमी वाटते.(स्टेट बँकेच्या माहितीपत्रकानुसार वास्तुमूल्याच्या ९० प्रतिशत कर्जपात्रता असूनही प्रति लाख वास्तुमूल्यावर १५ वर्षासाठी मासिक कर्ज फक्त रु. २२५ इतकेच मिळणार आहे)

४) कर्जाला तारण म्हणून मालकीचे घर किंवा सदनिका आवश्यक असल्यामुळे भाड्याच्या घरात राहणाऱ्या ज्येष्ठाना योजनेपासून वंचित राहावे लागेल.

अशा रितीने ही योजना म्हणजे स्वतःच्या घराचे रूपांतर पैशाच्या अखंड स्रोतात करून साठोत्तरीचा काळ सुखात घालवता येईल अशी कामधेनूच आहे यात शंका नाही. मात्र तिचे स्वरूप अधिक स्पष्ट व सुनिश्चित होईपर्यंत सबुरीने घेतलेले बरे. -०-

आग्रहाची विनंती

श्री. वा. ग. मराठे यानी कळविले आहे की त्यांच्या 'कृतार्थ मी,कृतज्ञ मी' या आत्मकथनाची दुसरी आवृत्ती प्रकाशनाच्या वाटेवर आहे. हितगुज सप्टेंबर २००७ मध्ये या विषयीच्या लेखामध्ये प्रसिद्ध केल्याप्रमाणे त्यांच्या संपर्कातील परिवार सदस्यांनी पाठविलेल्या 'वा.ग.' विषयक आठवणींचा / पुस्तकावरील प्रतिक्रियांचा समावेश या आवृत्तीत करावयाचा आहे. लेख पाठविण्याची अंतिम मुदत <u>३१ मे २००७</u>.(वा.ग.मराठे, जोगेश्वरी-पू.: फोन-२८२६९४०२)-सहसंपादक.



# माझ्या लग्नाची गोष्ट

सौ.राधा मराठे,१९-बी, प्रज्ञातेज, प्रज्ञापार्क, सर्वे नं. ५४/३, कोथरुड, पुणे ४११०३८.
फोन २५३६०००४; सेल ९८५०४ ३३६३१ ई-मेल: <radha_m@vsnl.com>

तीस वर्षे होत आली, पण अजून त्या सगळ्या घटना काल घडल्यासारख्या डोळ्यासमोर आहेत. तारीख, वार, प्रसंग, कोण काय म्हणालं सगळं अगदी लख्ख आठवतंय.

आईने माझ्यासाठी 'स्थळं' बघायला सुरुवात केली होती. त्यावेळी वधुवर सूचक मंडळं हा एक मुख्य मार्ग होता नवरा शोधण्याचा. आईने अशाच एका मंडळातून मराठ्यांच्या 'मुला' चं स्थळ आणलं. त्यांची पदवीधर मुलीची अपेक्षा सोडली तर अपेक्षा जुळणाऱ्या वाटत होत्या. (मी तेव्हा पदवीधर नव्हते.) नंतर नकार घ्यायची किंवा द्यायची वेळ आली तर हिरमोड व्हायला नको म्हणून आईने तिच्या पद्धतीने आधीच बाहेरून चौकशी करायला सुरुवात केली. पण आईने जशी चौकशी केली तसं तिला कळलं, त्यांना केवळ नोकरी करणारी आणि पदवीधर नाही तर सुंदरही मुलगी हवी आहे. पदवीच्या मुद्यावर आईने तडजोडीची शक्यता गृहीत धरली होती, कारण माझी नोकरी उत्तम होती. पण जोडीने मुलगी सुंदरही असण्याची अपेक्षा होती म्हटल्यावर आईने सरळ मराठ्यांच्या नावावर काट मारली व शेराही लिहिला 'सुंदर मुलगी पाहिजे'. दोन दिवसांनी अभ्यंकर नावाचे एक मध्यस्थ आमच्याकडे आले आणि त्यांनी नेमकं मराठ्यांचंच स्थळ सुचवलं. आईने तिचा रिपोर्ट त्यांना सांगितला. त्यांचं म्हणणं, "जाऊन बघायला काय हरकत आहे.?" "नकार येणार याची खात्री आहे तर जायचं कशाला ?" या माझ्या प्रश्नावर आईने दैवाचा हवाला दिला आणि मी माझ्या पहिल्याच 'कार्यक्रमा' ला तोंड द्यायला नाइलाजाने आणि नाखुषीनेच तयार झाले.

आम्ही मराठ्यांकडे जाऊन आलो. मला मुलगा पसंत पडला. पण आश्चर्य म्हणजे दोन दिवसांत त्यांच्याकडूनही चक्क होकार आला. आम्ही सगळे चाट पडलो. सुंदर मुलगी हवी असणाऱ्या या मुलाने मला कसा काय होकार दिला ? आईने पुन्हा चौकशीची चकारी फिरवली. ही अपऱ्या नाकाची, गहू वर्णी आणि सडपातळ (श्री. मराठ्यांच्या मते नकटी, काळी, किडकिडीत) मुलगी या माणसाला सुंदर वाटते आहे, काही गडबड नाही ना ? पण पुन्हा पुन्हा चौकशी करूनही सगळं काही 'आलबेल' आहे असं कळल्यावर आम्ही पुढे गेलो. दुसऱ्या वेळी त्यांच्याकडच्या इतर माणसांची भेट झाल्यानंतर त्याच्या दुसऱ्या दिवशी माझे मोठे दीर स्वत: आमच्या घरी येऊन पक्का होकार देऊन गेले. आता मात्र आई जरा गंभीर झाली. प्रश्न माझ्या उभ्या आयुष्याचा होता. माझ्या दृष्टीने मराठे शंभर टक्के शाकाहारी आणि निर्व्यसनी होते हे मुद्दे खूप महत्त्वाचे होते. शिवाय वडील लहान वयात गेलेले असूनही डोक्यावर एक पैसा कर्ज नव्हतं. म्हणजे मनगटात ताकद आणि मनात ईर्ष्या होती हे स्पष्ट होते. जुनी, चाळीतली जागा आणि आर्थिक परिस्थिती या मुद्यांचा मी पुनर्विचार करावा असे आई-दादांना वाटत होते. पण मला वाटत होते, "माझ्या नशिबात असेल, त्याच्यात हिंमत असेल तर तो मिळवेल पैसा. नाहीतर मी नोकरी करतेच आहे. आणि असलेला पैसा नादानपणे घालवणारी माणसं आपण थोडी बघतो का ?"

४-८ दिवस विचार करून आई-दादांनी रुकार दर्शवला आणि बैठक झाल्यापासून विसाव्या दिवशी मी सौ. मराठे झाले सुद्धा. माझी मोठी बहीण बाळंतपणाला यायची होती, त्यामुळे लग्न लगेच करून घ्यावं हा माझ्या आईचाच आग्रह होता. तिचा अनुभव, इतरांची मदत आणि मराठे मंडळींचा कार्य साधेपणाने करण्याचा प्रस्ताव या सगळ्यामुळे लग्न विनासायास पार पडलं. (त्यांनीही माझी चौकशी केलीच होती आणि आमच्या घराण्याबद्दल खात्री पटल्यामुळेच होकार दिला होता हे अर्थातच त्यांनी मला लग्न झाल्यानंतर सांगितलं.)

लग्न झाल्यावर एका वेगळ्याच गोष्टीचा उलगडा झाला. मध्यस्थांनी आम्हाला आणि मराठ्यांनाही सांगितलं होतं की "त्या मंडळींनी पत्रिका पाहिली आहे, ती जमते आहे." आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि पाऊल पुढे टाकले. पुढे काही अडचणी आल्या त्यावेळी आईने कुणाला तरी आमच्या पत्रिका दाखवल्या, तेव्हा कळले की आमच्या पत्रिका फारशा जमत नव्हत्या. वस्तुस्थिती कळल्यामुळे खचून, घाबरून न जाता आम्ही येणाऱ्या अडचणींना सामोरे गेलो, आणखी काही त्रास होऊ शकेल हे गृहीत धरून तयारीत राहिलो आणि त्यामुळेच बहुधा, सगळ्या अडचणींतून सहीसलामत पार पडून, एकमेकांच्या संगतीने यशस्वी संसार केला. (गुण जमले नव्हते,तरी ग्रह जमले होते असे म्हणायला हरकत नाही.)

आज मागे वळून बघते तेव्हा वाटतं की सांसारिक अडचणी कुणाला चुकल्यात ? माझा विश्वासही खरा ठरला. लग्नानंतर श्री. मराठे आपल्या कर्तृत्वाने झपाट्याने वर चढले, नवीन घराचे कर्ज फेडून माझी नोकरीही मी सोडली. आज आम्ही दोघे देवाचे आभार मानतो की भलत्या बाबींना फाजील महत्त्व न देण्याची बुद्धी आम्हाला अंबाबाईने दिली. आता श्री.मराठे नोकरीतून निवृत्त होण्याच्या वाटेवर आहेत. आम्ही आता आजी-आजोबाही झालो आहोत. या सगळ्या विलक्षण योगायोगाच्या घटना आठवून मन अचंबित होते.

आईने काट मारून ठेवलेले स्थळच मध्यस्थांनी सुचवावे, पत्रिकांचा त्यांनी केलेला घोळ आमच्या लक्षातच येऊ नये आणि लौकिक बाबींना अवाजवी महत्त्व न देता आम्ही आमचे निर्णय ठामपणे घ्यावे या सगळ्यातून लग्नगाठी स्वर्गात मारल्या जातात असे म्हणतात ते खरेच असावे असे वाटते. -०-

## कुलवृत्तांताचा असाही उपयोग!

सी. गो. खांबेटे, अंधेरी

नुकतीच एक बातमी वाचली. शीर्षक होते- पत्ता हरवलेले आजोबा.(म.टा. २४-३-२००८) कालिना(सांताक्रुझ)ला रात्री ८ वा. रिक्षात बसलेल्या आजोबानी, ' मला शुक्रवार पेठेत सोडा. माझी बहीण अपंग आहे. तिच्याकडे जायचंय.'असे सांगितल्यावर रिक्शावाला चक्रावला. आजोबांना स्मृतिभ्रंश झाला होता. काही आठवत नव्हते. त्याने आजोबाना वाकोला पोलिस स्टेशनमध्ये सोडले. आता इंस्पेक्टर म्हापुणकरांची डोकेदुखी सुरू झाली. आजोबांना नावाशिवाय काही सांगता येत नव्हते. नाव समजले ते 'वसंत दत्तात्रेय लिमये.' वय अंदाजे ८०-८१. पण पत्ता ? कुणास ठाऊक ! वेळ रात्रीची १० वाजताची. अनेक लिमये बांधवांना फोन झाले. शेवटी कोणीतरी लिमये कुलवृत्तांत व्यक्ती-सूचि धुंडाळली. वसंत दत्तात्रेय या नावाचे १२ लिमये होते. त्यातील ५ मृत व ५-६ साठीच्या आतले. शेवटी हे एकमेव वसंतराव पुण्याचे असून प्रभात टॉकीजमध्ये ऑपरेटर असल्याची नोंद सापडली. पुण्यात प्रभात टॉकीजकडे संपर्क साधला. आणि सारे स्पष्ट झाले. त्यांची अपंग बहीण वांद्रा खेरवाडीत राहते.पत्नी निधनानंतर दुसरे कोणी नसलेले वसंतराव सैरभैर झाले. त्याना बहिणीने आधार दिला होता. १८ तासातच त्यांना घरी पाठवता आले. अशा रितीने अखेर कुलवृत्तांतच कामी आला.!

-०-



# साठा उत्तराची कहाणी

सौ. वृषाली वामन मराठे (पृ.५०३)जोगेश्वरी पू.
दूरध्वनी-२८२६१४०२

मी सौ. वृषाली म्हणजेच आमच्या गोरेगांव लोकलची काकू. नुकताच माझा ६०वा वाढदिवस झाला. माझी मैत्रीण सौ. मीना, जी माझ्याहून बरीच लहान आहे, तिचा वाढदिवस १६ तारखेला व माझा १५ ला असतो. म्हणून दरवर्षी आम्ही दोघी मिळून गाडीतील मैत्रिणीना पार्टी देतो. यावर्षी सर्वांनी ठरवलं, एकत्र घरी जेवण द्यायचं. आमचे हे सांगली साहित्य संमेलनाला जाणार होते त्यामुळे घरी मी एकटीच होते. सर्वांना माहीत आहे की काकूंचं घर मोठं आहे आणि इथे सर्वांना मोकळेपणा मिळेल.१९ तारीख नक्की ठरली. मेनू भोगीचा म्हणजेच वांग्याची भाजी, भाकरी, मुगाची खिचडी, कोशिंबीर, पापड इ. आमच्या अमिताने नुकतीच हाफ सेंचुरी पूर्ण केली. ती म्हणाली, मी पण तुमच्यात सहभागी होते. ती मोठा केक आणणार होती. उत्साहमूर्ती सुनीती, जयंती, मीना, मीनाक्षी, वनिता, सुषमा, नयना, सगळ्या सात वाजता आल्या. मीनाने भाजी भाकरी आणली. गंमत म्हणजे आमची सर्वात लहान मैत्रीण सोनल वय वर्षे २२, हिने पण आपली हजेरी लावली. सर्वजणी घरचाच कार्यक्रम आहे अशा वावरत होत्या. त्यांनीच केक, मेणबत्त्या आणल्या. फुगे फोडले, औक्षण केले. आम्हा दोघीना साडी चोळी दिली. फोटो काढले. केक खाल्ल्यावर हळदी-कुंकू झालं. अमिताने एक गेम ठेवला होता. त्यात बक्षिसे पण होती. नंतर भाजी भाकरी, खिचडीवर ताव मारला. शेवटी आइसक्रीमची चव घेत घेत सर्वजण घरी जाण्यास निघाल्या

असा माझ्या 'गोरेगांव लोकल' पुतण्यांनी साजरा केलेला वाढदिवस मी कधीच विसरणार नाही.

अशी ही साठा उत्तरांची कहाणी सुफळ संपूर्ण.

-०-



# नांवात काय आहे!!!

प्रेषक- रमाकांत म. विद्वांस (पृ.६२३), माहीम

(२३-१२-०७ च्या जागतिक चित्पावन महासंमेलनानिमित्त माझे मेहुणे श्री. विजय जोशी,रोचेस्टर,अमेरिका यांचेकडून प्राप्त लेखावरून )

चित्पावन मंडळी आज जगभर पसरलेली आहेत व त्यांना एकत्र आणणे ही काळाची गरज आहे हे ओळखून चित्पावन संघाने पहिल्या महासंमेलनाचा घाट घातला आहे त्याबद्दल संघाचे अभिनंदन व आभार. संघाच्या कार्यकर्त्यांचे कौतुक करावे ते थोडेच आहे. व्यक्तिगत पातळीवर लक्ष्मी व सरस्वती यांना एकत्र आणण्याची करामत अनेकांनी करून दाखविली आहे. या महासंमेलनामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर भरीव व्यावसायिक तसेच सामाजिक कार्यास सुरुवात होईल अशी आशा व्यक्त करून विषयाकडे वळतो.

चित्पावन आडनांवांबद्दल मला लहानपणा पासून काही प्रश्न व खूप कुतूहल आहे. आद्य नांव चिपळूणकर होते काय? बामणांमध्ये मराठे कोठून आले? सोहनी सिंधमधून आले काय? वगैरे. थोडे खोलात गेल्यावर लक्षात आले की कोकणस्थांचा इतिहास आणि त्यांची नावे यात काहीतरी विलक्षण नाते आहे. ते असे.

चित्पावन मंडळी हजारो वर्षे कोकणात [illegible]ांनी आपले नांव पेशवे करतांच जादूची कांडी फिरली. त्यांनी आपली क्षत्रिय वृत्ती दाखवून रणांगण गाजविले व त्यांच्यातील मराठे नावारुपास आले.

थोरल्या बाजीरावापासून नानासाहेब पेशव्यांपर्यंत त्यानी उत्तर भारतावर वर्चस्व गाजविले, त्यांच्यातील काही तेथेच स्थाईक झाले व स्थानिक समाजात सहज मिसळून गेले ते त्यांच्या हिंदी सदृश नांवांमुळे. जसे, दाम-ले, ले-ले, भिडे, आगऱ्याचे पेठे वगैरे, वगैरे.

शिवाजी महाराजांच्या काळापासून ते आजपर्यंत गरीब, श्रीमंत, सान, थोर यांना परवडेल अशा भावात प्रत्येक दसऱ्याच्या दिवशी सोने मिळते ते केवळ आपटयांच्या कृपेने!

पेशवाईच्या काळात इंग्रजांना जे साडेतीन शहाणे दिसले त्याचे कारण साने (sane). पुढे इंग्लंडमध्ये गेल्यावर गोडबोल्यांचे गोडसे झाले. (गोडबोले =गोड say=Godsay= गोडसे). तरीही त्यांनी आपले चित्पावनत्व कायम राखले.

खानदेशात कोनाड्यास गोखला म्हणतात. त्यातील कंदिलाच्या प्रकाशात सर्व खोली उजळून येते. असाच एका सर्वार्थाने चित्त पावन असलेल्या गोखल्यांच्या प्रकाशात महात्मा गांधीना 'Petite' पावनाचा मार्ग दिसला!

संत हे आडनांव शंभर टक्के देशस्थ असल्यामुळे विसाव्या शतकापर्यंत एकही चित्तपावन संत नव्हता. 'संत भावे देवाला' या उक्तीमुळे विनोबा भावे पहिले चित्तपावन संत झाले!

सन १९६० पासून चित्तपावन मंडळी उत्तर अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर येऊ लागली व त्यांनी या खंडात एक मोठी सामाजिक क्रांती घडवून आणली आहे. गेली शेकडो वर्षे कोकणामध्ये जे गुण्या गोविंदाने परंतु बिनबोभाट चालत आले आहे ते आज अमेरिकेत होत आहे.

गोरे आणि काळे विवाह. (कोकणातल्या काळ्यांची मुलगी गोरे यांच्या मुलापेक्षा वर्णाने थोडी उजवी असते ही गोष्ट वेगळी!)

अमेरिकेत Marketing क्षेत्रात अत्यंत यशस्वी कामगिरी करणाऱ्या चित्तपावन मुलीचे नांव माल विका दाम ले असल्यास त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे?

USA चे कर्वे उसाच्या कर्व्यांइतकेच गोड असतात असे कर्व्यांचे जावई म्हणत होते.

'विठ्ठल' बरवा आणि 'माधव' बरवा हे बर्वे बंधू 'इ.टे.' वर कटिबद्ध आहेत!

परशुराम(-पुत्र)'चिप=chip' ळूणकर सिलिकॉन व्हॅलीमध्ये वाळूचे कण रगडून त्यात चेतना आणीत आहेत!

थोडक्यात चित्तपावन आडनांवे व (कालानुरूप) वेगवेगळ्या क्षेत्रातील त्यांची यशस्वी वाटचाल यांच्यात 'strong correlation' दिसून येते. काळाच्या ओघात उरलेली नावे पण उत्तम कामगिरी करतीलच.

'ती'च्याकडे डाळ न शिजल्याने ज्योतिषीचे जोशी कसे झाले हे सर्वज्ञात आहेच.

त्यापैकीं एक-

विजय जोशी, रोचेस्टर,न्यूयॉर्क
vijay16joshi@yahoo.com

-०-



## भाऊच्या धक्क्यावरून

-सदानंद विष्णू अर्थात भाऊ मराठे,(पृ.५०७)
नीलमणी, डॉ. राऊत रोड, दादर-प. मुंबई ४०००२८;दूरध्वनी: २४४४८६४८

(साहित्य-संगीत-कलाविषयक कार्यक्रमांचे उत्कृष्ट निवेदनकार म्हणून सुप्रसिद्ध असलेले भाऊ मराठे [illegible] ह लोकप्रिय एकपात्री निवेदनात्मक कार्यक्रम ते सादर करतात. प्रतिष्ठानच्या वर्धापनदिनी त्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचा संपादित भाग-त्यांच्याच शब्दात- सहसंपादक सी.गो. खांबेटे)

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आचार्य अत्र्यांची तुफान भाषणे चालू होती. विविध वृत्त साप्ताहिकाचे संपादक रामभाऊ तटणीसांनी लिहिलं: "आचार्य अत्रे ज्या तऱ्हेने काँग्रेसला लाथा घालायला सांगत आहेत याचं कारण म्हणजे अत्र्यांचं मूळ आडनांव गाढवे आहे!" पुढच्या नवयुगमध्ये अत्र्यांचा खुलासा प्रसिद्ध झाला:

"गाढव आणि तटनीस-

विविध वृत्त चे संपादक रामभाऊ तटणीस यांनी आचार्य अत्र्यांचे मूळ आडनांव 'गाढवे' आहे असा एक नवीन शोध लावला आहे. ह्या संशोधनाच्या अनुषंगाने आम्हाला आणखी एक शोध लागला. तो असा की कालांतराने गाढवाचा एका तट्टाणीशी प्रेमसंबंध जडला, आणि त्यापासून जी खेचर संतती निर्माण झाली ती पुढे तट्टाणीस-तट्टणीस-तटणीस या नांवाने ओळखली जाऊ लागली. त्या 'गाढवे' वंशीय 'तटणीसां' च्या एकापेक्षा एक खेचरलीला पाहून 'गाढवे' वंशातल्या लोकांना इतका पश्चात्ताप झाला की त्यांनी आपले आडनांव बदलून टाकले."

ब्रँडीची बाटली या आचार्य अत्रे यांच्या चित्रपटातल्या "कृष्णा, तुला सोळा हजार बायका आहेत, आम्हाला एकदा तरी चान्स दें' या वाक्यावरून अत्रे-माटे वाद झाला. त्यावेळी आचार्य अत्रे एका भाषणात म्हणाले : खरं तर आपण पुणेकर सर्वात अधिक पावित्र्य विडंबक आहोत. आपल्या हिंदू धर्माने सांगितलेल्या कोणत्या दैवताबद्दल पुणेकरांना आदर वाटतो? सर्वश्रेष्ठ रामभक्त जो ब्रह्मचारी बजरंगबली हनुमान त्याला आपण पुणेकरांनी कोणकोणती नांवं ठेवायची शिल्लक ठेवलेलं आहे? 'भांग्या मारुती', 'बटाट्या मारुती', 'पत्र्या मारुती','भिकारदास मारुती'. ज्या श्रीकृष्णाचा कैवार घेऊन आमच्या ब्रँडीची बाटली या चित्रपटातल्या पावित्र्य विडंबनाचा वाद या संस्कृतीप्रेमी मंडळींकडून उपस्थित करण्यात आला आहे त्या श्रीकृष्णाला पुणेकरांनी 'खुन्या' मुरलीधर बनवला! जगत्सूत्रधारक देवाधिदेव विष्णूला आपण 'बायक्या' विष्णू बनविले आणि बालाजीला 'छिनाल' हे विशेषण लावून पुणेकरांनी पावित्र्य विडंबनाचा कळस केला आहे!

आचार्य अत्रे ज्या बैठकीत असत त्या बैठकीचा एक अलिखित नियम होता. फक्त अत्र्यांनी बोलायचं आणि बाकीच्यांनी मनसोक्त हसायचं. आपल्यासमोर पाचदहा हजार माणसं बसलेली आहेत, त्यांना ऐकू जाईल अशी आवाजाची पट्टी अत्रे लावीत असत. एकदा कविवर्य राजा बढ्यांच्या घरी आचार्य अत्रे, अनंत काणेकर, सोपानदेव चौधरी, अशांची गप्पांची मैफल रंगली होती. त्या मैफिलीत भारतातल्या एका फार मोठ्या पुढाऱ्याची अत्यंत खाजगी भानगड जाहीर आवाजात सांगतांना आचार्य अत्रे म्हणाले: "काँग्रेसवाला म्हटला की त्याची बाईची भानगड ठरलेली!" तेव्हा अनंत काणेकरांनी हळूच विचारलं, "मग तुमचं आणि वनमालाबाईंचं काय होतं?" त्यावर आचार्य अत्रे ताडकन् म्हणाले: "त्यावेळेस मी स्वतः काँग्रेसमध्ये होतो!" अशी सगळी गंमत चालू होती आणि अचानक कविवर्य बोरकरांनी एन्ट्री घेतली. एखाद्याच्या नुसत्या एन्ट्रीने बैठक इलेक्ट्रीफाय होते म्हणजे काय ते त्या दिवशी कळलं. बोरकर म्हणजे स्वच्छ धोतर, रेशमी झब्बा,खांद्यावर बेफिकीरीने टाकलेली शाल, अनामिका आणि करंगळीच्या बेचकीत धरलेली कॅप्स्टन सिगरेट, अशा झोकातच आत आले. बोरकरांना बघितल्यावर अत्रे उचंबळून म्हणाले: "एक वेळ काट्याविना बोर दिसेल पण शालीविना बोरकर दिसणं केवळ अशक्य!"

अशाच दुसऱ्या एका गप्पांच्या मैफिलीत कथाकार वामनराव चोरघड्यांनी एन्ट्री घेतली. वामनरावांचा धिप्पाड देह बघून आचार्य अत्रे म्हणाले: 'नांव वामन आणि उंची सहा फूट!'

अशा आचार्य अत्र्यांची सुखाची अत्यंत साधी व्याख्या होती:

"या इथे तरुतळी सुरई एक सुरेची
खावया भाकरी, हाती वही कवितेची"

-०-

## श्री. भाऊसाहेब (वि.गो.) मराठे यांचे कुलबांधवांना पत्र

साता समुद्रापलिकडून मराठे प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य, मराठे-कुलवृत्तांत-कर्ते आणि आता वार्धक्यामुळे शरपंजरी असलेले आपले भीष्मपितामह श्री.भाऊसाहेब मराठे आणि सौ. मालतीबाई यांचे अलिकडेच आलेले पत्र पुरेसे बोलके आहे.

आपल्यापैकी प्रत्येकाच्या घरी कुलवृत्तांताच्या निमित्ताने त्यांची १५-२० वर्षापूर्वी "माहिति पाठवा" म्हणून वारंवार पत्रे आली असतील. आपणाकडून कधी उत्तरे गेली असतील कधी नसतील. आज मात्र त्याना आपली सर्वांची आठवण येत असते. किंबहुना ही आठवण हाच त्यांचा बहुमोल ठेवा आहे. त्यांचेशी संपर्क साधावा असे आपणास वाटत असल्यास आपल्या माहितीसाठी त्यांचे नवीन पत्ता असलेले पत्र जसेच्या तसे देत आहे.-सी. गो. खांबेटे, सहसंपादक, हितगुज.

"४ मार्च २००८

सर्व कुलबांधवांना सप्रेम नमस्कार

पत्ताबदल कळविण्याच्या निमित्ताने चिटोरे टाकीत आहे.

आम्हा दोघांच्याही तब्येती ठीक नाहीत. सध्या एका सुसज्ज नर्सिंग होममध्ये राहात आहोत. व्यवस्था उत्तम आहे. १२ वर्षे इथे स्वतंत्र जागा घेऊन राहाता आले हे काही कमी नाही. आमचे पाहून इतर काहींनी तो प्रयोग केला हे उल्लेखनीय! पेनाने कागदावर लिहिण्याची सवय सुटत चालली आहे. अधिक करून फोन आणि ई-मेल वापरतो. त्यातही आता ई-मेल देखील कमी. "प्रतिष्ठान" बद्दल पूर्वीसारखीच आपुलकी वाटते. "हितगुज" कडे डोळे लावून असतो. अंक उशीरा मिळतात. पण मला त्या कामाची कल्पना असल्यामुळे समजून घेतो. केव्हा केव्हा पोस्टाचीही गडबड झालेली असते.

कळावे लोभ असावा ही विनंती.

आपला,

वि.गो.मराठे"

New address:
VINAYAK MARATHE & / OR
MALATI MARATHE
C/O MADHAV MARATHE
18477 EDMINTON DRIVE,
CUPERTINO, CA 95014 (USA)
New Telephone: 408-865-0220
Email-MalatiM @aol.com



सौ.कमला यशवंत जोशी,

## प्रकाशज्योत-सौ.कमला यशवंत जोशी,

१०२,हेरंब बिल्डिंग, बोरभाट लेन, गिरगांव-मुंबई ४००००४;
दूरध्वनी-२३८५२९८५
शब्दांकन-सौ.सुमेधा प्र. मराठे

बडोद्यातील सर्वांत जुने आणि नामांकित केमिस्ट व पहिले व्यापारी कै. विष्णुपंत कृ. मराठे (पृ. ४२१) यांची द्वितीय कन्या (कुसुम) सौ. कमलाताई यांचे तिघे बंधू - बाळकृष्ण,रघुवीर व मोहन आपला केमिस्ट व्यवसाय उत्तम चालवीत असून मोठी बहीण कोल्हापुरात तर लहान बहीण बडोद्यात स्थाइक आहे.

आज पंचाहत्तरीच्या घरात असलेल्या कमलाताई (ज.१५-११-३४) या १९५१ मध्ये मॅट्रिक होताच विवाह बंधनात अडकून मुलांच्या संगोपनाच्या जबाबदारीमुळे शिक्षण पुढे चालविता आले नव्हते. पण जिद्द आणि शिक्षणाची ओढ इतकी तीव्र होती की प्रापंचिक अडचणीतून सवड मिळताच वयाच्या ५८व्या वर्षी त्या बी.ए. झाल्या. नंतर ६५ व्या वर्षी कीर्तन विशारद पदवी संपादन करून कीर्तनाचे कार्यक्रमही करू लागल्या.

ब्राह्मणसभा, गिरगांव येथे नाट्यसंगीत व अभंगस्पर्धामध्ये भाग घेऊन त्यांनी सातत्याने ७-८ वर्षे पारितोषिके मिळविली आहेत. शिवाय पुरंदरे पुरस्कार म्हणून चांदीचा नटराज व फिरती ढाल, अनेक रोख बक्षिसे इ. मिळविण्याचा त्यांचा सपाटा तरुण पिढिला लाजवील असा आहे. निबंध व वक्तृत्वस्पर्धामध्येही त्यानी चांगले यश मिळविले आहे. आहारातून आरोग्य ह्या विषयावर टोरोंटो येथील एकता ह्या त्रैमासिकाने त्यांना २० डॉलरचे पारितोषिक देऊन गौरविले आहे. पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यावरील आयडियल बुक डेपोच्या २००५च्या स्पर्धेत त्यांचा निबंध बक्षिसपात्र ठरला होता. त्यांच्या आहार शास्त्रावरील अभ्यासाचा लाभ पु.ल. आजारी असताना त्याना बोलावून घेतला गेला हे त्या अभिमानाने सांगतात. तसेच बॉम्बे हॅस्पिटलमध्ये आहारविषयक कॉन्फरन्स मध्येही त्यांचा सहभाग होता हे विशेष उल्लेखनीय होय. अलिकडच्या कालात त्यांनी मेळघाटच्या जंगलात १० दिवस राहून अभ्यास केला आहे.

कमलाताईंचे पति यशंतराव जोशी, एम.कॉम्. हे निवृत्त आयकर अधिकारी असून शेतीची आवड म्हणून गांवी शेती संभाळतात. एक मुलगा इंजिनियर, दुसरा डेंटल सर्जन व मुलगी एम.ए.(मानसशास्त्र) आहे. मोठी सून बी.ए., नोकरीस रिझर्व बँकेत, तर धाकटी सी. ए. आहे. जावई एम. एस्सी(गोल्ड मेडलिस्ट) मोठी नात एम बी ए (लंडन) तर धाकटी नात व दोन नातू (पार्थ व अथर्व)कॉलेजात शिकत आहेत. मुलीचा एक मुलगा कणाद दोन वर्षापूर्वी सेंट थेरेसा मधून १० वीत सर्वप्रथम, दोन वेळा ऑल राऊंड विद्यार्थी तर धाकटा सात्वत ७ वीत शिकत आहे. अशा प्रकारे कर्तबगार आजीची मुले -नातवंडे तिला साजेशीच हुषार व विद्यासंपन्न आहेत यात नवल ते काय?

अशा या मराठ्यांच्या अनुभवसंपन्न शिक्षणप्रेमी ज्येष्ठ माहेरवाशिणीस- कमलाताईंस आरोग्यसंपदा व दीर्घायु लाभो ही शुभेच्छा.

-०-

---

(प्रतिष्ठानवृत्तःकार्यकारिणी-पृ.३ वरून)

तिसरी सभा शनिवार दि. १६ फेब्रुवारीला श्री. हेमंत मराठे यांच्या विलेपार्ले येथी नवीन निवासस्थानी झाली. सभेला १२ च्या वर सदस्य उपस्थित होते. मागील सभेतील विषयाला धरून श्री.खांबेटे यांनी कुलवृत्तांताच्या संगणकीय अक्षरजुळणीसाठी एका पानास रु.२५ प्रमाणे आलेल्या प्रस्तावाची माहिती दिली. हे काम सुरु करावे व त्यासाठी निधी निर्माण करावा असे ठरविण्यात आले. हे काम पूर्ण होण्यासाठी ६ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. सौ. स्वाती व श्री. हेमंत मराठे यांच्या विवाहाचा वाढदिवस असल्यामुळे उपस्थित सदस्यांनी उभयतांचे अभिनंदन केले. केक, अल्पोपाहार व चहापानांतर सभा समाप्त झाली. -०-

---

### हितगुज ७५: सप्टेंबर २००८ विशेषांक

-आवाहन- १

मराठे परिवारातील लेखक व त्यांचे प्रकाशित साहित्य, शोध निबंध,इ. ची सूची या विशेषांकात देण्याचा विचार आहे त्यासाठी माहिती- लेखकाचे नाव व परिचय ,जन्मतारीख, प्रकाशित पुस्तकांची यादी, पृष्ठसंख्या, किंमत, विषयाचे स्वरूप इ.ची माहिती कळवावी.

## कॉम्पॅक्ट डिस्कवर मराठे कुलवृत्तांत

सहसंपादक-सी.गो. खांबेटे

श्री. वि.गो. उर्फ भाऊसाहेब मराठे संपादित मराठे कुलवृत्तांत दुसरी आवृत्ती १९९१ ही तूर्तास प्रचलित असलेली अंतिम आवृत्ती आहे. या आवृत्तीच्या मुद्रित प्रती आता उपलब्ध नाहीत. एक सेवा म्हणून या आवृत्तीची (पृष्ठे ८७२ अधिक सुरुवातीची पृष्ठे २० मिळून) एकूण ८९२ पृष्ठे झेरॉक्स करून स्पायरल बाइंडिंग करून रु. ६०० किंमतीला मागणीप्रमाणे देण्याचा उपक्रम राबवून २०-२५ प्रती वितरित करण्यात आल्या. हा सर्व व्यवहार खूप कष्टाचा व खर्चिक होता.

या ऐवजी सर्वच कुलवृत्तांताची संगणकीय अक्षरजुळणी करवून घेऊन 'जसा आहे तसा' सी.डी. वर उपलब्ध करता येईल काय याची चाचपडणी केली असता तशी शक्यता दृष्टीपथात आली. एकूण ३० ते ४० हजार रुपये हा प्राथमिक खर्च अपेक्षित आहे. यामध्ये मूळ डाटा एंट्री, प्रुफे तपासणे,आणि नूतनीकरणासाठीची अद्ययावत माहिती जमवून तिचे त्या त्या पानावर संकलन करून सुधारित तिसरी आवृत्ती-२००८ उपलब्ध करणे अशी संकल्पना आहे.

आनंदाची गोष्ट म्हणजे यातील पहिला टप्पा म्हणजे मूळ डाटा एंट्री सुरू झाली असून आजमितीस पहिली १४० पृष्ठे (घराणी १ ते २२) मूळबरहुकूम कोणाही सदस्याला ई-मेलने पाठविण्यासाठी तयार आहेत. (मात्र मूळचे फोटो उपलब्ध नसल्यामुळे ते वगळावे लागत आहेत. त्याऐवजी सदस्यांकडून नवीन मागवून नंतर टाकता येतील.) बाकीची पृष्ठेसुद्धा पूर्ण करण्याचे हे काम जून २००८ अखेरपर्यंत होऊन हितगुजच्या ७५ व्या (सप्टेंबर २००८) विशेषांकात या विषयीची तपशिलवार योजना प्रसिद्ध केली जाईल.

या कामीच्या खर्चासाठी कुलवृत्तांत निधीमध्ये देणग्या पाठविण्याचे आवाहन करीत आहोत. तसेच आपल्या कुटुंबियांपैकी ई-मेल ॲड्रेस असणारांनी "maratheparivar@yahoo.co.in" या पत्त्यावर त्वरित संपर्क साधावा. त्यांना संबंधित माहिती ते सदस्य नसले तरिही मोफत पाठविली जाईल. ती त्यांनी आमच्या सूचनेनुसार अद्ययावत करून पाठवावी म्हणजे हे कुलवृत्तांताचे नूतनीकरणाचे काम अधिक सोपे होईल.

या अभिनव योजनेला आपल्या सर्वांचे सक्रिय सहकार्य व विधायक सूचनांची अपेक्षा आहे.धन्यवाद.



# मला भावलेले राजकीय नेते - सोनियाजी

-ह.मो. मराठे, एन-२०४, पिनाक मेमरीज, कोथरूड, पुणे ४१००३८; सेल: ९४२३०१३८९२

(२५ डिसेंबरच्या प्रतिष्ठान पुणे शाखेतर्फे आयोजित २८वा वर्धापन दिन व दैनंदिनी प्रकाशन सोहळ्यात प्रमुख वक्ते श्री.ह. मो. मराठे यांचे भाषण झाले त्यांच्या भाषणाचा संपादित भाग. स्वैर शब्दांकन -सहसंपादक श्री .सी. गो. खांबेटे )

एकदा माझी भाची, आपण तिला बनी म्हणू या, मला म्हणाली, मामा तुम्ही इतके वेगवेगळ्या ठिकाणी फिरता, प्रवास करता. अनेक माणसाना भेटता. तर सांगा ना, तुमची सर्वात ज्यास्त आवडती व्यक्ती कोण? प्रश्न जरा कठीणच होता. मी म्हटले मला अनेक लोक अनेक कारणामुळे आवडतात. त्यात सचिन तेंडुलकर असेल अमिताभ असेल अगदी राखी सावंतसुद्धा असेल. असे एकच नाव कसे सांगू?

बनीने आज ठरवले होते, माझ्याकडून ठाम उत्तर मिळवायचेच. मग ती म्हणाली. आपण राजकीय नेत्यांबद्दल बोलूया. तुम्हाला सोनिया गांधी नाही आवडत? मी म्हटले, का नाही ? आवडतात ना.

इटलीसारख्या छोट्या देशात जन्मलेली एक मुलगी भारतासारख्या महान देशाची प्रमुख राजकारणी बनते, ते सुद्धा तिला राजकारणात बिलकुल रस नसूनही! हेच किती मनोवेधक आहे. राजीव गांधी केंब्रिज विद्यालयात शिकत असताना सोनिया सुद्धा इंग्लिश स्पीकिंग कोर्ससाठी प्रवेश घेते. विद्यालयाच्या कँटीनमध्ये सोनिया व राजीव याची भेट होते तो किस्सा सुद्धा मजेदार आहे. टेबलावरच्या पेपर नॅपकिनवर राजीव चार ओळी खरडतो. ती चिठी एका सर्वोत्कृष्ट शँपेनच्या बाटलीसह वेटर मार्फत सोनियाकडे पाठवतो. झालं, जमलं आणि भेटींचा सिलसिला सुरू!

पहिल्या भेटीत सोनियाचे भारतविषयक ज्ञान किती तोकडे आहे हे राजीवला समजून येते. तिच्या माहितीप्रमाणे भारत म्हणजे अजूनही साप, हत्ती, नंगे साधू याची प्रमुख वस्ती असलेला प्रदेश. असो.

पुढे सोनिया राजीव विवाह सोहळा संपन्न होतो. विवाहस्थळ कोणते तर अमिताभचे बच्चन यांचे घर. पुढे याच अमिताभला राजीवने लोकसभेचे तिकिट दिले.

राजीव गांधी हे एयर इंडिया मध्ये पायलट होते. त्यांना आणि सोनियांना राजकारणात अजिबात रस नव्हता. पण संजय गाधींच्या अपघाती निधनानंतर इंदिराजींनी राजीवना राजकारणात आणले. पुढे राजीवजींची हत्या झाली तेव्हा अर्जुन सिंगांनी सोनियाजीना राजकारणाची सूत्रे हातात घेण्याची परोपरीने गळ घातली. पण त्या ठामपणे अलिप्त राहिल्या. फारच पिच्छा पुरवल्यावर तर एकदा त्यांनी निक्षून सांगितले की, "मी वेळ पडली तर दिल्लीला चौकात भीक मागेन पण राजकारणात येणार नाही." बिच्चारे अर्जुनसिंग!

एकाद्या ज्योतिषाने सोनियाजींच्या त्या हॉटेलमधल्या पहिल्या भेटीच्या वेळेची कुंडली मांडली तर काय समजेल? ही राजीव व सोनिया भेट झालीच नसती तर? चार वर्षापूर्वी जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीची सर्वेसर्वा होता होता राहिलेल्या ह्या महिलेचे भविष्य त्या क्षणाशी निगडित असेल काय? राजकारणात येण्यास निर्धाराने नकार असूनही हे कसे घडले असेल?

सोनियांची मुलगी अमेरिकेत न राहता भारतात राहणार. मुलगा सुद्धा राजकारणातच पुढे येणार. भारतात राहून रिस्क घ्यावयास सोनिया परिवार का तयार झाला असेल? पं. मोतिलाल नेहरूंपासूनची परंपरा खंडित होऊ नये हा विचार अधिक प्रभावी ठरला काय?

आता राहुलचे रीतसर पदार्पण झाले आहेच. तो एक स्वतंत्र विषय आहे. त्याबद्दल पुन्हा केव्हा तरी. असो. -०-

## *ह.मो.मराठे-*

अल्प परिचय

परिचयकार- सौ.नीलांबरी मराठे, पुणे.

अनेक नियतकालिकांचे व वृत्तपत्रांचे संपादकपद भूषविलेले 'ह.मो.मराठे' ह्यांनी आतापर्यंत ३०-३५ पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे 'बालकांड', 'पहिला चहा' अशी किती तरी पुस्तके वाचकप्रिय झाली आहेत. मध्यंतरी सकाळ या वृत्तपत्राने वाचकांच्या पसंती विषयक प्रतिक्रिया मागविल्या होत्या. त्यामध्ये ह मों चे पोहरा हे पुस्तक निवडलेल्या ५० पुस्तकांमध्ये तिसऱ्या क्रमांकाचे ठरले.

'काळेशार पाणी' या त्यांच्या कादंबरीवर 'डोह' सिनेमा निघतोय. अनेक मासिके आणि दिवाळी अंकातूनही त्यांचे विनोदी तसेच वैचारिक लेख आपण वाचतो.

त्यांचे 'ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार?' आणि 'जानव्याचा गुंता सुटला' असे अनेक लेख खूपच गाजले आहेत. यंदाच्या दिवाळी अंकात 'ह.मों.' चे २५ च्यावर लेख आले आहेत. सभोवतालच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाकडे मिश्किल नजरेने बघत, त्यातील विनोद, विसंगती आणि हास्यास्पद गोष्टींचा शोध घेत चुरचुरित नर्मविनोदी, चविष्ट आणि खट्याळ लेखन करून वाचकांना विचार करावयास लावणे हे त्यांच्या लेखनाचे वैशिट्य आहे.

-०-

## हितगुज साठी खूषखबर

श्री.ह.मो.मराठे यांनी यापुढे हितगुजसाठी नियमितपणे लिहिण्याचे मान्य केले आहे.त्यांचे विषय निवडीचे स्वातंत्र्य अबाधित आहे.-सहसंपादक.

**पणजोबा प्रभाकर शिवराम मराठे यांच्या स्मरणार्थ**

**प्रभाकर दामोदर मराठे वडाळा, मुंबई ४०००३१**

सेल: ९८२० २३२ ०८२ दूरध्वनी : २ ४१५ ०८८९ ई-मेल: **prabhakar_marathe@yahoo.com**

## *माहेरच्या अंगणात*

सौ. रोहिणी विजय मराठे,

११/२,एरंडवणे शारदासेंटर,फ्लॅट नं.४,कर्वे रोड,पुणे ४१०००४: दूरध्वनीः २५४४१८०८

'माहेरच्या अंगणात' हा विषय देऊन आम्हा भगिनींना आपण लिहितं केलं हे निश्चित. कोणाचे माहेर श्रीमंत किंवा गरीब, कोणाचे खेड्यात तर कोणाचे शहरात, कोणाचे बंगल्यात तर कोणाचे झोपडीत असते. तर काय, माहेर कोठेही व कसेही असले तरी भगिनींना माहेर हे प्राणप्रिय असते. अगदी आमच्या सारख्या भगिनींना नातवंडे असली तरीही माहेरची ओढ कधीही कमी होत नाही. माहेरी बालपण जाते. पुढे शिक्षण व लग्न होईपर्यंत भगिनी माहेरीच असतात. पण लक्षात राहतात त्या बालपणाच्या स्मृती. माझे बालपण मात्र इतरांपेक्षा वेगळे होते.

घरची गरिबी असल्यामुळे मी इयत्ता पहिली ते चौथी आजी, मावशी इत्यादि नातेवाइकांकडे राहात होते. नंतर हिंगणे महिलाश्रम हायस्कूलच्या वसतीगृहात राहावयास गेले. महर्षी कर्वे यांनी मुलींसाठी शाळा व वसतीगृह सुरू केले. त्यामुळे माझ्यासारख्या मुलींची खूपच चांगली सोय झाली. माझ्यासारख्या खूप मुली वसतीगृहात होत्या. त्यामुळे मी रमले. तिथे अकरावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे एक वर्ष तेथील वाचनालयात काम केले. वर्गातील मैत्रिणीच वसतीगृहात असल्यामुळे आम्ही बहिणींप्रमाणे वागत असू. मधून मधून माझा भाऊ व मावशी भेटायला येत. येतांना खाऊ आणत. त्यावेळी खाऊचे खूप अप्रूप वाटत असे. माझ्या मैत्रिणीही भाऊ, मावशी आली की भेटायला येत असत. त्यांना मी खाऊ देत असे. एक तीळ सात जणांनी वाटून घ्यावा म्हणतात. तसा आम्ही खाऊ वाटून घेत असू. माझी आई नोकरीनिमित्त कल्याणला राहात होती. त्यामुळे ती भेटायला येऊ शकत नसे. माझ्या दोन लहान बहिणी तिच्याजवळ होत्या. वडिलांची नोकरी यथा तथाच असून पगार पुरेसा नसे. म्हणून नाइलाजाने मला वसतीगृहात ठेवले गेले. मी त्याबद्दल कधीही हट्ट केला नाही. मी अभ्यास मन लावून केला. माझ्या क्षमतेनुसार मी मदत करण्याचा प्रयत्न केला. वसतीगृहात राहिल्यामुळे लहानपणातच मी समजूतदार झाले. आमचे शिक्षक, वसतीगृहातील मेट्रन आम्हाला आई वडिलांप्रमाणे आधार वाटत. भाजी निवडणे, ज्वारी तांदूळ निवडणे, भाकरीसाठी पीठ मळून देणे, इ. कामे करावी लागत. शिवाय आपले कपडे धुणे, ताटवाटी घासणे, वेणीफणी करणे ही कामे आमची आम्हालाच करावी लागत. शाळेला मोठे मैदान आहे. तेथे शाळा सुटल्यावर आम्ही हुतूतू, लंगडी, खोखो इ. मैदानी खेळ खेळत असूं. घसरगुंडी, झोपाळे, सीसॉ हेही मनसोक्त खेळत असू.

तेथे सकाळी सहा वाजता उठण्याची घंटा, नंतर दूध (पावडरचे) पिणे, अकरा वाजता जेवण, मधल्या वेळचे खाणे, व घंटा होताच रात्रीच्या जेवणासाठी हजर व्हावे लागे. उशीर झाल्यास जेवण मिळत नसे. भोंडला, सणा दिवशी रांगोळ्या काढणे, तोरणे बांधणे, दसऱ्याच्या दिवशी सोने देणे, इ. उपक्रम होत असत. सणाला गोडाचे जेवण असे. परिसरात आंब्याची, जांभळाची झाडे होती. तसेच बुचाच्या फुलांचीही झाडे होती. मे महिन्याच्या, दिवाळीच्या सुटीत काही मुली घरी जात असत.

मी कधी जात असे कधी नाही. पण जेंव्हा मी जात नव्हते तेंव्हा कितीतरी मुली अशा होत्या की त्यांना घरी जायला घरच नव्हते. तेव्हा मला वाईट वाटे. वसतीगृह हेच त्यांचे घर होते. आंब्याच्या दिवसात कैऱ्या पाडणे, जांभळाच्या दिवसात जांभळे पाडणे, ती फळे सगळ्यांनी मिळून खाण्यात मजा यायची. बुचाच्या फुलांच्या वेण्या करायच्या, केसात माळायच्या, खूप गंमत वाटे. वसतीगृहात राहिल्यामुळे स्वावलंबन, शिस्त, दुसऱ्यांना मदत करणे, आपल्यातला खाऊ देणे, आजारी असतांना मदत करणे, इ. गुण अंगी बाणले. शाळेत शेती हा विषय असल्यामुळे शेती विषयक ज्ञान मिळाले. होम सायन्स हा विषय नवीन होता. पाक कलेचे ज्ञान मिळाले. आम्ही समृद्ध झालो. वसतीगृह हे माझे माहेरच होते. अजूनही मी हिंगण्याला जाते. भेटते. दोन माहेरची घरे असल्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजते. अजून माहेरच्या अंगणातील खूप आठवणी मनात घर करून आहेत. किती सांगू आणि किती नको असे झाले आहे. आई वडिलांचे घर माहेर असणे खूप सुखद आहे. तर तिथल्या आठवणी किती सुखद असतील हे वसतिगृहात राहिल्यामुळे कळले.

-०-

## सभासदवृत्तः नांदा सौख्यभरे

१. पुणे येथील कुलबांधव डॉ.शाम विष्णू व डॉ. सीमा मराठे(पृ.४११)यांचा पुत्र चि. प्रणव B.E.Elec.व चि.सौ.श्रेया B.Sc.Chem. (श्री.दीपक व सौ.नीता करमरकर यांची कन्या) यांचा शुभविवाह दि.२० जानेवारी २००८रोजी पुणे येथील विष्णुकृपा कार्यालयात थाटामाटाने संपन्न झाला. (यानिमित्त सौ.निलांबरी मराठे संचालित वधु-वर मंडळ व श्री.नरेंद्र खांबेटे यांच्या सहभागासाठी डॉक्टर दांपत्याने धन्यवाद दिले आहेत.)

२. ढवळी-कवळे,गोवा येथील कुलबांधव श्री. कालिदास बाळकृष्ण व सौ. सुनंदा मराठे (पृ.५४१) यांचा पुत्र चि.बाळकृष्ण (उर्फ श्रीरंग) व चि.सौ. स्मिता(श्री.चंद्रकांत शंकर फाटक, वेंगुर्ले, यांची कन्या)यांचा शुभविवाह दि.१९ जानेवारी २००८ रोजी श्रीवामनेश्वर देवस्थान, फोंडा येथे थाटामाटाने संपन्न झाला.

वरील नवविवाहितांना प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.

-०-

## सभासदवृत्तः सहवेदना

१. दि. ८-३-२००८ रोजी ठाणे येथील श्रीमती प्रमिला यशवंत, वय ७७, (सदस्य श्री श्रीपाद यशवंत मराठे-पृ.८७, यांच्या मातोश्री) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

२. दि. ५-११-२००८ रोजी पुणे येथील श्रीमती मंदाबाई शंकर ताम्हनकर, वय ८५, (सदस्य श्री चिंतामण शंकर मराठे-पृ.६३, यांच्या ज्येष्ठ भगिनी व फुले मंडईतील दलाल श्री.ताम्हनकार यांच्या पत्नी) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन कर्तबगार कन्या, नातवंडे, पंतवंडे असा परिवार आहे.

वरील मृत व्यक्तींच्या आत्म्यास सद्गती मिळो.

-०-

### हितगुज अंक ७२:डिसेंबर २००७

हा अंक जरा उशीरा,जानेवारीच्या मध्यानंतर पोष्टात पडला असला तरी फेब्रुवारी अखेरही काही भागांतून अंक न मिळाल्याच्या सूचना येत होत्या. त्यानुसार अंक पाठविले. हा अंक मिळाल्यावरहि मागच्या अंकासाठी पत्ता व टेलिफोनसह त्वरित (३१ मे पर्यंत) पोस्टकार्ड पाठवून कळविल्यास उपलब्धतेनुसार अंक पाठविला जाईल. -सहसंपादक सी.गो.खांबटे.



# एक वही कवितेची

सुनीती ज. मराठे माटुंगा (पृ.१८०) दूरध्वनी.: २४१४१८७६

(कवितेच्या वहीतील जत्रेचा संदर्भ असलेली ही कविता संवेदनाक्षम मनाला चटका लावणारी आहे. हेच सुनीतीताईंच्या कवितेचे वैशिट्य आहे.-सहसंपादक)

(१)

### *जत्रा*

देवीच्या जत्रेला गर्दी झाली फार
हवशे नवशे गवशे यांचा लोटला जनसागर अपार
दुकानादुकानात,साडी,चोळी, हार,नारळ,
मिठाई, खेळणी, फुगे, पिपाण्या,
भराभर सारे खपत होते
भाविक दर्शन घेत होते,
साडी, चोळी, हार, नारळांचे
देवळात ढीग वाढतच होते!
भक्तीचा कल्लोळ दाही दिशांना दाटला
आनंदाचा जल्लोष गगनाला भिडला
नवस फिटत होते ढीगभर
कोंबड्या,बकऱ्या यांचे बळी
जात होते भराभर
भक्तांना त्या बळींचे बाधत होते तळतळाट
कुणाचे तरी बळी देऊन
होते का कुणाची भरभराट?
देवीचा झाला कोप, विजेचा झाला स्फोट
आगीच्या ज्वाळात माणसे होती गुदमरत,
बाहेर पडायला धडपडत
संतापलेल्या माणसांनी
दुकांनांवर फेकले बोळे पेटते
पोलिस गर्दीला आवरत होते,
कुणीच कुणाचे ऐकत नव्हते.
आग पसरली भराभर,
स्फोट झाले धडाधड
सगळीकडे पळापळ,
चेंगराचेंगरी गडबड गोंधळ
कुणीच नव्हते कुणाचे, एकमेका चालले तुडवत
गर्दीच्या सुनामी लाटा,पाठोपाठ होत्या आदळत
किती मेले, किती पडले,
जायबंदी किती झाले
तरणे म्हातारे, पोरेबाळे,
आपल्याच फिकिरीत प्रत्येकजण
हताश होऊन देवी सगळा
बघत होती हाहाःकार
देवीच्या साड्या कामी आल्या
कफनासाठी भक्तांच्या
मंत्री पुढारी, सगळे आले,
धुरळा उडवत निघून गेले
आश्वासनांची झाली खैरात,
मृतांना भरपाई दीड लाख
सखूबाईचे सर्वस्व गेले,
होत्याचे क्षणात नव्हते झाले
नवरा मुले, सासू सासरे,
कुणीच नाही परत आले
सखुबाई म्हणाली, या पैशाचे मी करु काय?
जगण्याला माझ्या आता अर्थच काय?
साळूबाईचे सासुसासरे गेले होते जत्रेला,
सुखरूप परतले घराला.
साळूबाई म्हणाली, ही म्हातारी खोडं,
परतली तरी कशाला?
तिथेच खपले असते तर
नसते का मला मिळाले तीन लाख? -०-

श्रीमती सुधा लक्ष्मण मराठे, भोपाळ.(पृ.९६) दूरध्वनी-(०७५५)२४६६८७९

(श्रीमती सुधाताई या हायर सेकंडरी स्कूल,भोपाळ येथे १३ वर्षे प्राचार्या पदी राहून १९९० साली निवृत्त झाल्या.चैत्रगौरी निमित्त त्यांच्या या दोन संपादित कविता -सहसंपादक सी.गो.खांबेटे)

(२)

### *चैत्र मासी देवी गौरी*

चैत्र मासी देवी गौरी, आली माहेरी
सुखदायिनी शांततामयी, करुणेच्या सागरी
हिरवा शालू नेसूनी, अंजिरी चोळी भरजरी

बाजूबंद शोभती, तिच्या त्या गोऱ्या दंडावरी
हिमकुमारी लाडाची ही आली कन्या हर्षानी
आम्रवनी वनदेवी झुलली झूला मोदानी

सख्यां संग वनविहार करते गीताना गाउनी
शीतल मानसस्पर्श करोनी धुंद तशी होवोनी
आरस करुनी डोल्हाऱ्यामधि गौरी ही शोभती
हळद-कुंकू सोहळा साजरा होई घरोघरी

डाळ-करंजी प्रसाद म्हणुनी वाटिती प्रेमानी
माहेरवासिनी जाइ सासरी अक्षततृतीयादिनी
मुरड-कान्होला दहिभाताची शिदोरी घेवोनी
पुनरागमना पुढच्या वर्षी आस तशी देवोनी
जगद्वंद्य तू देवी तुज मी पुजिते मनोमनी
भगिनींचा हा करुनि साजरा सण आनंदाने
स्वसंस्कृतीला जतन करूया,श्रद्धा विश्वासाने।

(३)

### *माझी फुलबाग*

अंगणी माझिया गुलाब फुलला ग
पांढरा, गुलाबी, पिवळा अन् केशरी
जाइ जुई शेवंति मोगरा आणि अबोली ग
उदयाचलि माझे मानस हरले ग

भंडार निसर्गा असे तुझे अनमोल
सर्वश्रेष्ठ तृप्ती मन माझे लाभेल
दरवळे गंध अन् होई मन चंचल
पांखरे शोषिती सुम-रस तो कोमल

आम्रतरू लिंबोणी यांची छाया बागेवरी
राखण्या तजेला निसर्ग चिंता करी
अनुकरणि असावी नित्य वृक्षवल्लरी
निरपेक्ष दुजांची सेवा अविरत करी

बागेची मजला नित्य साथसंगत
अंतरंग मम उदास असता करीतसे हर्षित
क्षणभर येथे विश्रांती मज करिते उल्हासित
मोजकीच मी फुले निवडुनी देवाला अर्पिते
कुणी अचानक कधीतरी मम गुलाब तोडीते
ध्यानी येता विमनस्क मी उदासवाणी होते

'देवपुजेस्तव खुडिले' मानुनी शांति मिळे सत्वर
प्राणांहुनि मजला ते असती गुलाब सदाबहार
-०-

**हितगुज ७५:**
**सप्टेंबर २००८ विशेषांक**
-आवाहन- २

अंदाजे ७५ पृष्ठांच्या या विशेषांकासाठी आपल्या निवडक साहित्याची अपेक्षा आहे.
कथा, प्रवासवर्णन, कविता, लेख, अनुभवकथन, आठवणी, बालसाहित्य, विनोद, चारोळ्या, व्यंगचित्रे इ.विविध प्रकारचे साहित्य पाठवावे .
सोबत आपला फोटो, टेलिफोन, पूर्ण पत्ता, ई-मेल इ. अवश्य पाठवावे.
अंतिम तारिख १५ जुलै २००८

वि.म.मराठे,(पृ.२३५)
पद्मश्री,विश्रामबाग,सांगली४१६४१५;दूरध्वनी: (०२३३) २३०००७२

(४)

## शासन हवे कशाला?

तीस नोव्हेंबर दोन हजार सहा उजाडला,
जेथे धूर तेथेच अग्नी, समज खोटा ठरला
पुतळ्याचे जे निमित्त असुनी मात्र उत्तरेला,
माजले अराजक आणिक सारा महाराष्ट्र पेटला
जळली 'दक्षिणराणि' आणी किति लोकलगाड्या
फोडुनी अन् पेटवुनी कोटिचा चुराडाहि केला.
सारे असुनी देखत,ज्वाला आकाशा भिडल्या
बघणे सारे मिटल्या तोंडी, शासन हवे कशाला?
ऊसाचे उत्पादक आणिक कारखाने भिडले
भाव-वाद भडकला,उसाच्या गाड्याना जाळिले
मजुरांची तर उपासमार, पण पर्वा कोणाला
हे पहाण्याचे नशिबी आले,शासन हवे कशाला?
विज उत्पादन आणी वितरण, धोरणे सरकारांची
कार्यवाहिची जबाबदारी, फक्त नोकरांची!
निदर्शन हे निमित्त निषेधा, हाणामारी झाली
अधिकारी हतबल ते असती, तसे कर्मचारी
परंतु चोरा सोडुन देउनि संन्याशाला फाशी
करायचा हाच न्याय तर शासन हवे कशाला?
घटनाक्रम हा सरत्या वर्षा, पुरे असे जाहला
शांतीसंगे दाखवि शासन, विनती नववर्षाला

-०-

(५)

## सुटका!

भेट तुझ्या घरची स्मरते, अजुनि त्या दिसाची
कल्पनाहि नव्हती मजला, पुढिल सकंटांची
तुझा पिता बंधू दोघे असति उभे ते दारात
हास्ययुक्त वदने म्हणती 'यावे ना घरात'
प्रवेशिता दिसली मजला उभी तुझी माय
होति तिथे मोठी बहिणा कशी महाकाय!
अवतार तुझा वर्णावा, तो ड्रेस तंग होता
प्रत्यांग सकल, कष्टे बळेचि तो डोकावता
पत्रिकेत होते वर्णन, बांधा तुझा सडपातळ
सडपातळ हा असे, मग काय 'स्केल'स्थूल?
वर्ण तुझा सांवळा वर्णिला, पत्रिकेत लिहिला
सावळा नसे, असेल काळा, कयास मी केला!
रंगाचे वर्णनीच करिती एक 'स्टेप' वरती
नसे सांवळा काळाहि नसे एक स्टेप खालती
अशा रितीने वर्णाचा,बांध्याचाही झाला निकाल
चहापोह्यांचा नंतर झाला होता तो 'फरियाल'
'गाणे शिकला काय' असा मी प्रश्न एक केला
'गाणे गाउन उत्तर देते तुम्हि ऐकावे जरा'
विनतीच्या या संमतिपूर्विच तान तिने मारिली
कानांवरचे संकट हेरुनि धूम आम्ही ठोकली !

-०-

श्रीमती सुनीता सु.गोखले
(उषा गोपाळ मराठे -पृ. ३८८),
३५/३७ शिवाजीनगर,वनराज बिल्डिंग,
जुना तोफखाना, पुणे ४११००५;
दूरध्वनी: (०२०)-२५५३६८४४

(७)

## वरमाईचा दिलासा

लेकीच्या तुम्ही आई म्हणूनी।
आणु नका हो नयनी पाणी ।
लेक तुमची सून आमुची ।
होईल ती या घरची राणी ।।
आणु नका हो नयनी पाणी
करीन माया तिजवरती मी।
उणेन काही पडेल या घरि।
ठेव आमुची याच घरीची ।
बहु मायेने तुम्हि जी जपली ।।.....आणु नका
संस्कारांचे शिंपण करुनी।
सुविद्य केले कलागुणांनी।
मंगल समयी मंगल दिनी।
लक्ष्मी अमुची घरात आली।।.....आणु नका
सोन पाउलि येता लक्ष्मी।
मोद भरला याच सदनी
चिंता कसली मनी नसावी।
लेक तुमची माझि जाहली।।.....आणु नका
नवीन नाती आज जुळती।
झालो आपण दोघी बहिणी।
राहो निरंतर नाती आपुली।
हीच प्रार्थना प्रभुचरणी ।। .....आणु नका

-०-

सतीश मधुकर मराठे (पृ. ५५८) वालावलकर रुग्णालय योगनिदान व संशोधन केंद्र ,
कर्मचारी वसाहत नर्मदा-२, श्रीक्षेत्र डेरवण (सावर्डे), तालुका चिपळूण, जि.रत्नागिरी ४१५६०६
दूरध्वनी: निवास-(०२३५५) २६४५४६; मोबाईल- ९९२१२५२१८३

(६)

## जागतिक चित्पावन महाधिवेशन

आज हे नवलचि झाले ।
चित्पावन एकत्र झाले ।
गोत्र चतुर्दश कुळे अनेक
चित्पावन ही छत्री एक
सांगति जगता या एकमुखे
जगा रे तुम्ही आम्हासारखे।। १।।
देशोद्धारा येत एकत्र
लटके नसते तिळमात्र
गरज आज देशाला जाणुनी
आले येथ महासंमेलनी ।।२।।
दावी सकलां या आदर्शा
असू आम्ही जगि विस्तारित
नाही कधी आप्ताना विसरत
काल आज अन् उद्याही नित ।।३।।
पेशवाइवर भारत जगला
पेशवाइवर भारत तरला
महाराष्ट्रभू सदा राखिले
राजे छत्रपती सांवरले।।४।।
चित्पावन जे सुसाध्य करिती
जरिपटका अटकेवरि नेती
राज्याचे हित प्रथम चिंतिती
राज्य नि राजा मोठे करिती ।।५।।
चित्पावन जगदोद्धारा युक्त
देशरक्षणा दक्षहि सतत
यज्ञी स्वातंत्र्याच्या आहुत
अर्पण करिता स्वराज्य प्राप्त।। ६।।
स्वातंत्र्याच्या समरी पावन चित्पावन जाहला
वेदीवर बलिदानासाठी अग्रस्थानि धावला
अंदमान काळ्या पाण्याचे मानकरी ते कित्येक
स्वातंत्र्याचा रवी दावितो चित्प्रकाश अनेक।।७।
झुंजती लढति ते मरती ध्येयाप्रती
तळहाति शिरा घेऊनी तयांनी केली ईप्सितपूर्ती
स्वतंत्रतेच्या स्वप्नकळ्यांचे दर्शन याना घडले
विरुनिया वेदना चित्प्रसन्न होउन फुलले ।।८।।
शृंखला तोडिल्या साऱ्या आपण स्वबळे निर्धाराने
सोसिल्या यातना अखंड दुर्धर हाल किती कष्टाने
झोडिले समाजे अविरत आम्हा निष्ठुर निर्दयतेने
तरिही नाही भीक प्रार्थिली राहुनि ताठ कण्याने९
आशीष भार्गवाचा सदैव असे मस्तकी अमुच्या
आकांक्षा मनिच्या अमुच्या गगना गवसायाच्या
उत्तुंगासह अनंत ध्येयासाठी आपण झटुया
आशा हीच धरोनी साऱ्या विश्वाला जिंकूया।१०।

(वरीलपैकी काही कवितांमध्ये मूळ कवींची क्षमा मागून कमी अधिक बदल करून सौंदर्यवृद्धी साधण्याचा प्रयत्न केला आहे .संबंधितांनी आपल्या प्रतिक्रिया कळवाव्यात-सहसंपादक सी. गो. खांबेटे)

# स्वामी समर्थ रामदासांची कृष्णभक्ती

डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे

(श्रीसमर्थ रामदासांची रामभक्ती तर प्रसिद्ध आहेच परंतु त्यांची कृष्णभक्तीही मोठी अप्रतिम होती कशी ते या श्रीसमर्थ जन्म चतु:शताब्दिर्षानिमित्त विशेष अभ्यासपूर्ण लेखात वाचा.-सहसंपादक)



महाराष्ट्रातील संतपरंरेत संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांच्याच परंपरेत समर्थ रामदासांचे नांव घेतले जाते. ह्या २००८ साली समर्थ रामदासांची ४००वी जयंती येते तेंव्हा २००७च्या राम नवमीपासून २००८च्या रामनवमी पर्यंत हे चतु:शताब्दीवर्ष साजरे केले जात आहे. १४ मार्च १६०८ रामनवमी ते १२ फेब्रुवारी १६८२ दासनवमी असे ७४ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य संत रामदासांना लाभले होते.

समर्थांची ग्रंथसंपदा विपुल आहे. दासबोध, मनाचे श्लोक, आत्माराम, करुणाष्टके, शेंकडो अभंग, आरत्या स्तोत्रे, प्रासंगिक रचना, दासगीता, डफगाणे, आनंदवनभुवन, वासुदेव, दंडीगाणे, पांगुळ, दिवटा, दाट्या, सवाया इ. सुमारे ४०००० ओवी संख्या भरेल इतकी अफाट काव्यरचना समर्थ रामदासांनी लिहिली आहे.

'ब्रह्माण्ड भेदुनी रामकथा पैलाड न्यावी' असा उद्घोष करून समर्थांनी रामभक्तीची ध्वजा केवळ महाराष्ट्रात नव्हे, भारतात नव्हे, तर तिन्ही लोकात फडकाविली. रामदासांचे अवघे जीवन राममय झाले होते. 'राम जीविचा विसावा' असा त्यांचा निरंतर अनुभव होता. रामभक्ती हेच त्यांच्या जीवनाचे सार सर्वस्व होते. ते श्रीरामाचे अनन्यसाधारण भक्त होते हे खरे, तथापि त्यांच्या जीवनात कृष्णभक्तीचा प्रवाह कसा खळाळून वहात होता हे फार थोड्या लोकांना माहीत असेल. तेव्हा प्रस्तुत लेखामध्ये रामदासस्वामींच्या कृष्णभक्तीचे मनोरम दर्शन घडविणे हा हेतु आहे.

### श्रीकृष्णाच्या ऐश्वर्यसंपन्न माधुर्याने संत रामदास आकर्षित

हिंदुस्थानात असा एकही साधू वा संत आढळणार नाही की ज्याचे अंतःकरण कृष्णभक्तीने आकृष्ट झाले नसेल. प्रत्येक संताचे अंतःकरण, मग तो शिवभक्त असो वा रामभक्त असो, गोपाळकृष्णाच्या गोकुळातील लीलांनी नेहेमीच आकर्षित झालेले आहे. समर्थ रामदासांच्या अंतःकरणात सुद्धा हा सगुण कृष्णभक्तीचा स्त्रोत वहात होता.

श्रीराम व श्रीकृष्ण हे दोन्ही पूर्णावतार खरे. पण ह्या दोघांमध्येही सूक्ष्म भेद आहे, तरतमभाव आहे. राम अवतार हा कर्तव्यभावनेने बद्ध आहे, अर्थात् म्हणूनच तो मर्यादा पुरुषोत्तम आहे. पण कृष्णाचे ठिकाणी अवतारपूर्णता विशेष आहे. 'कृष्णस्तु भगवान् स्वयम्।' असे भागवतकारांचे वचन प्रसिद्ध आहे. भगवंताची ऐश्वर्यसंपन्नता व माधुर्यसंपन्नता ही श्रीकृष्ण अवताराच्या ठिकाणी विशेष प्रकट झाली म्हणून तर श्रीकृष्ण हा विशेष असा पूर्णतर अवतार आहे. व तो संत साधूंना फार प्रिय आहे. अशा श्रीकृष्णाच्या ऐश्वर्याने व माधुर्याने संत रामदासही आकर्षित व्हावेत यात नवल ते काय ?

### श्रीकृष्णभक्तिवीण तरला आहे कोण ?

'श्रीकृष्ण गुणी माते ।सर्वत्र करी गे सरते।' अशा ओवीमय शब्दात श्रीज्ञानदेवांनी आपल्या निवृत्तीगुरूंजवळ कृष्णगुणगानाचे सप्रेम मागणे मागितले आहे. द्वापारयुगात कृष्णावतार चालू असताना रामभक्त मारुतीरायांना सुद्धा कृष्णलीला पाहण्याची उत्कट इच्छा झाली आणि त्यांनी रामरायाच्या सगुणरूपापुढे मागणे मागितले ते असे- 'कृष्णलीला पाहू हेत हा मनी।
दावी सीताकान्ता दीनालागी।' संत तुलसीदासांनी 'गोकुल प्रीत नीत नइ जानि' म्हणून कृष्णप्रेम व्यक्त केललेे दिसते. तुकाराम महाराजांना ज्यावेळी विठ्ठलकृपेने काव्यस्फूर्ती झाली त्यावेळी प्रथम त्यांनी श्रीकृष्णाची सुंदर बालक्रीडा आपल्या काव्यात वर्णन केली. श्रीमत् आद्य शंकराचार्य मोठे अद्वैती असे शिवभक्त होते. पण त्यांनीही मोठ्या प्रेमाने कृष्णलीला गायली आहे. त्यांनी आपल्या आईला अंतसमयी श्रीकृष्णाचे दर्शन घडविले. श्रीनामदेव महाराज म्हणून तर विचारतात, 'कृष्णभक्तिवीण तरला आहे कोण ? द्यावा निवडून एक तरी।'

'चरित्र जे उच्चारावे केले देवे गोकुळीं' असे म्हणत श्रीकृष्णलीला-कृष्णचरित्र -कृष्णाचे मधुर रूप हे सर्व साधुसंतांचे फार मोठे आकर्षण आहे. समर्थ रामदास ह्या गोड नियमास कसे अपवाद असणार ? समर्थांनी आपल्या दासबोध या ग्रंथात चौथ्या दशकात अर्चनभक्तीचे वर्णन केले आहे त्यात केशवनारायणादि चोवीस कृष्णनामांचा उल्लेख केला आहे. तो असा- ''केशव नारायण माधवमूर्ती । गोविंद विष्णु मधुसुदनमूर्ती। त्रिविक्रम वामन श्रीधरमूर्ती। हृषीकेश पद्मनाभ।।१०।। दामोदर संकर्षण वासुदेवमूर्ती। प्रद्युम्न अनिरुद्ध पुरुषोत्तम मूर्ती। अधोक्षज नारसिंह अच्युत मूर्ती। जनार्दन आणि उपेंद्र।।११।। (-दासबोध दशक ४ समास ५ ओवी १०-११)

### राधे तूझा कृष्ण हरी

गोकुळात भगवंताने जे चरित्र केले ते फारच रमणीय असे आहे. 'राधे तूझा कृष्ण हरी। गोकुळात फंद करी।' या पद्यात कृष्ण गोपींच्या घरी जातो, दहीदूध चोरतो, गोपींना वाटेत अडवितो, त्यांचेबरोबर वाटेत विनोद वचन करतो, गोपाळांना घेऊन रानोमाळ हिंडतो व गौळणी लीन होऊन शेवटी कृष्णाला शरण जातात हे सर्व वर्णन समर्थांनी रेखीवपणे कृष्णभक्ताच्या दृष्टीतूनच केले आहे. 'राधे तूझा कृष्ण हरी। गोकुळात फंद करी। वडजे वाकडे विडाळ । त्यांच्यासंगे खेळ तू। नेटनेटके रूपलावण्य साजे । यमुनेतिरी रम्य राजे विराजे ?' या काव्यातून रामदासांची कृष्णभक्ती कशी उत्कट होती त्याचे दर्शन होते. 'गोपगोविंद गोपाळ' या त्यांच्या रचनेतूनही रामदास गोकुळीच्या लीला मोठ्या प्रेमाने वर्णन करताना दिसतात.

### खरा कृष्ण हा विष्णुपूर्णावतारी

'रामकृष्ण' नावाचे एक मोठे लालित्यमय प्रासादिक गीत रामदासांनी गाइले आहे. या गीतात एक श्लोक रामवर्णनाचा तर लगेच पुढचा श्लोक कृष्णवर्णनाचा अशी कलात्मक शैली आहे. या 'रामकृष्ण' गीतात कृष्णलीला गाताना 'चरित्रे विचित्रे करी गोपनाथ । क्रीडाकौतुके नाटकी तो समर्थू।', 'धरा मानसी कृष्ण हा प्रेमासाठी', 'मनीं लागली सर्व ही कृष्णगोडी' इत्यादी ओळींतून

रामदासांचे कृष्णप्रेम व्यक्त होताना दिसते. कृष्णाची गोवर्धनलीला तसेच कालियामर्दन वर्णन करताना समर्थ लिहितात,

'जेणे पर्वताचे तळी गोकुळासी। बळे राखिले नाथिले काळ यांसी। या रामकृष्णगीतात कृष्णावताराचे पूर्णत्व व्यक्त करताना रामदास 'खरा कृष्ण विष्णुपूर्णावतारी । चतुर्भूज पीतांबरू चक्रधारी।' असे म्हणतात. कृष्णाच्या पूर्ण अवतारत्वाने तसेच त्याच्या मधुरत्वाने संत रामदासांच्या मनाचा अगदी ठाव घेतला आहे.

### वेधु लागला हरीचा

श्रीकृष्णाच्या वेणुनादाचे वर्णन रसिकतेने करताना रामदास म्हणतात, 'रुणझुण रुणझुण मंजुळ मंजुळ । अहो रंग वाजे ।' कृष्णवेणुचा मधुर नाद श्रवण करता करता रामदासांचे अंतःकरण गोपीविश्वात एकदम प्रवेश करते. गोपीवाणीने रामदास सखीजवळ अर्थात साजणीजवळ संभाषण करताना चकित होऊन म्हणतात, 'सखे चित्त हे चोरिले वेणुनादे। मनू भेदिला साजणी नाद छंदे।'. वेणुवादन करणाऱ्या ह्या गोपाळकृष्णाचे रूप रामदासांच्या ध्यानचक्षूंपुढे तरळते. रामदास हा रूपमहिमा गाताना म्हणतात, 'त्रिभंगी उभे सावळे रूप ज्याचे। ठसावे मनी ध्यान सर्वोत्तमाचे। ' ह्या मुरलीधरास पाहाण्यासाठी चित्तात आर्तता निर्माण होते. 'रूप मनी आठवे। आवडी घेतली जीवे। यदुवीरा पहावे । सर्व सांडूनी।' अशी तीव्र इच्छा रामदासांना होते ते विरहिणीची भाषा बोलू लागतात. 'युगासम दिवस जातो। रामदास वाट पहातो। वेधु लागला हरीचा। अवस्था बहु लागली रूपवेधे।' अशी विरहव्यथा रामदासांची पाहून 'पडिले दूरदेशी। मज आठवे मानसी । कान्हो वनमाळी नेगी भेटवा कां?' या ज्ञानेश्वरांच्या विरहिणीचे शब्द आठवतात. रामदासांचे उत्कट कृष्णप्रेम या विरहिणीतून व्यक्त होताना दिसते.

### समस्तांमध्ये सार गोपाळकाला

गोपालकृष्णाची कालभक्षण लीला श्रीनामदेव तुकारामादि संत मोठ्या बहारीने आपल्या काव्यात वर्णन करतात. गाई घेऊन गोपाळांसमवेत कृष्ण वनात जात असे.दुपारी सूर्य डोक्यावर आला म्हणजे कृष्ण व त्याचे सवंगडी गोपाळ आपल्या शिदोऱ्या सोडीत आणि त्यांची कालभक्षण लीला सप्रेम होत असे. देवभक्तांचे प्रेमैक्य हा कालभक्षण लीलेतील मुख्य भाग होय. 'रामकृष्ण' काव्यात कृष्णाच्या या क्रीडेचे माहात्म्य गाताना समर्थ म्हणतात, 'समस्तांमध्ये सार गोपाळ काला। तया देखता चाखता जीव घाला।'. गोपाळकाला नामक काव्यात रामदास म्हणतात, 'गोपाळ म्हणती घालू हमामा। दोहू चला रे गाई धमामा।' ह्या कारणासाठी कृष्णाचे गोपाळ एकमेकांना सप्रेम आवाहन करताना म्हणतात, 'देवाने केला तीरि बसून काला यमुनेच्या । चाल गड्या, वडजा, वांकड्या घोंगड्या। सोडा गाठोड्या सिदोरीच्या।' पुढे याच गीतात गोळपापडी, पिठले, पुऱ्या, पोळी, करंज्या, कान मोडदी, मुगवडे, विविध प्रकारची लोणची इ. पदार्थांचे वर्णन वाचून तोंडाला पाणी सुटल्यावाचून राहणार नाही. काल्याला पोषक असे हे सर्व वर्णन आहे. महत्त्वाचे म्हणजे 'भजनी भाव असू द्या' असेही समर्थांनी या गोपाळकाला गीतात आवर्जून सांगितले आहे.

ह्या काल्याचा प्रसाद सेवन करण्यासाठी ब्रह्म लोकातील स्वर्गातील ब्रह्मादिक देव माशांच्या रूपाने अवतीर्ण झाले होते. हा रम्य भाग वर्णन करताना संत रामदास म्हणतात,

'वाकुल्या दावीत जा रे, मुचमुच्या।
शीत सांडू नका, हात तुम्ही पुसा ।
घोंगडीला घासा, ब्रह्मा झाला मासा ।
बोले रामदासा सत्य वाचा।'.

'नंद गौळियाचे बाळ, गाई रंजन वेल्हाळ' असे गोपाळ कृष्णाचे वर्णन करणारे समर्थ कालभक्षणलीला, वेणुवादनलीला, गोरक्षणलीला, भावमयतेने वर्णन करताना दिसतात. त्यावरून समर्थ रामदासांची कृष्णभक्तीहि मोठी अप्रतिम होती. त्यांच्या काव्याचा हा आस्वाद भाविक व रसिक मनाला निश्चितच घेता येतो. धन्य ते रामदास व धन्य त्यांच्या कृष्णभक्तीचा जिव्हाळा!

-o-

(बेवारस- पृ. ५ वरून)

दखल न घेता मी उडी मारुन डबा ताब्यात घेतला व छातीशी कवटाळला. डबा उघडून कोपरापर्यंत हात भाजणीमध्ये खुपसला आणि मला धक्का दिलेली सौ. च्या दागिन्यांची पुरचुंडी बाहेर काढली. मी आनंदाश्रूंनी दागिन्यांची खानेसुमारी करीत होतो. ध्वनिसंपर्कावरून सूचना सुरू होत्या आणि आठ दहा तास माझा डबा बेवारस म्हणून सांभाळणारा मोठा फलक माझ्यासमोर होता त्यावर लिहिले होते- 'बेवारस वस्तूस हात लावू नका, तो बॉंब असू शकतो!'

-o-

### मराठे परिवार-परस्पर सहाय्य योजना

आपली नवीन सदस्य कुलभगिनी डॉ. सौ. माधवी संदीप जेस्ते (डॉ. मधुसुदन पु. विद्वांस पृ.६५३ यांची कन्या) या नेत्रशल्यतज्ज्ञ असून डॉ. संदीप जेस्ते हे प्रसूति व स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. त्यांचे दादर येथे अष्टविनायक सर्जिकल नर्सिंग होम आहे. त्यांनी आपल्या परिवार-सदस्यांसाठी त्यांचेकडे घेतलेल्या वैद्यकीय सेवामध्ये १० टक्के सवलत देऊ केली आहे. सदस्यांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा. मराठे प्रतिष्ठानतर्फे डॉ. जेस्ते दांपत्यास शतशः धन्यवाद. त्यांचा ई-मेल पुढीलप्रमाणेः sjeste@yahoo.co.uk

Dr. Madhavi Jeste (Vidvauns) and Dr. S. S. Jeste
Ashtavinayak Hospital.

We would like to offer 10 percent discounts for patients who wish to be examined and operated in any surgical gynec and ophthalmic categories.


Kindly visit our website : ashtavinayak.110mb.com

### कै.चिं.ब.मराठे निबंधस्पर्धा २००८ निकालविषयक माहिती

मागील हितगुज अंकामध्ये जाहीर केलेल्या वरील निबंधस्पर्धेसाठी अत्यल्प प्रतिसाद आल्याचे स्पर्धा -संयोजक श्री गजानन चिं. मराठे यानी कळविले आहे. त्यांच्या दि. १८-२-०८च्या पत्रानुसार खालील तीन सदस्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला त्यांना प्रोत्साहनपर पारितोषिके प्रत्येकी रु. १०० पाठविण्यात आली आहेत असे त्यांनी कळविले आहे.

१. श्री. ज.गो. मराठे,आगाशी (पृ.४०५)
   (गट-४) विषय- माझा परिवार
२. सौ.वसुंधरा श्री.मराठे, ठाणे (पृ.१७५)
   (गट-३) विषय- माझ्या लग्नाची गोष्ट
३. सौ.सुनीता सु. गोखले,पुणे(पृ.३८९)
   (गट-४)विषयः मोबाइल गरज की फॅड?

-o-


डॉ. मधुसूदन विद्वांस

# फॅमिली डॉक्टर (वैद्यकीय व्यवसाय)
## उदात्त रुग्णसेवा की आपमतलबी धंदा?

डॉ.मधुसूदन पु. विद्वांस, (पृ. ६५३ )
सहजीवन सोसायटी, गोखले रोड दादर-प. मुंबई ४०००२८; दूरध्वनी : (०२०) २४२२१३०८

(डॉ.विद्वांस (ज.स.१९३०) एम.बी.बी.एस., हे गेली ५० वर्षे दादर भागातील प्रथितयश वैद्यकीय व्यावसायिक असून त्यांनी मेडिकल कॉलेजांमधून १९५९ ते १९७६ या काळात अध्यापनही केले आहे. सुपर स्पेशलायझेशनच्या आजच्या युगात फॅमिली डॉक्टर ही संकल्पना लुप्त होत असलेली पाहताना या व्यवसायात शिरलेल्या अनिष्ट प्रथांमुळे त्यांना होणारी व्यथा त्यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवातून शब्दबद्ध केली आहे. त्यांनी दैनिक लोकसत्ता (मुंबई वृत्तांत ) मध्ये दि. १-१-२००८ पासून फॅमिली डॉक्टर या सदरामध्ये सुमारे एक वर्षासाठी दर मंगळवारी हे लेखन प्रसिद्ध करावयाचे ठरले आहे. हितगुजच्या वाचक सदस्यांसाठी जानेवारीत प्रसिद्ध झालेले सुरुवातीचे चार लेख सोबत दिले आहेत. काही निवडक लेख पुढील अंकामध्येही देण्याचा मानस आहे. शक्य असेल त्यांनी हे लेख लोकसत्तामध्ये नियमित वाचणे योग्य ठरेल. आपल्या प्रतिक्रिया कळवाव्यात. -सहसंपादक सी गो.खांबेटे)

### (१) फॅमिली डॉक्टर- आपला मित्र

११ फेब्रुवारी १९५५ पासून मी वैद्यकीय व्यवसायात फॅमिली फिजिशियन म्हणून स्वतंत्र व्यवसाय करीत आहे. या बावन्न वर्षांच्या प्रदीर्घ काळात मी अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहेत. कामाचा ढाचा बदलत गेला. आता वापरण्यात येणाऱ्या औषधांपैकी ९०% औषधे पन्नास वर्षांपूर्वी अस्तित्वात नव्हती. समाजात खूपच बदल झाला आहे. नीतीमूल्ये पार बदलून गेली आहेत. तसाच काहीसा बदल वैद्यकीय व्यावसायिकांतही झाला आहे. प्रथम हे बघूया की हा फॅमिली फिजिशियन म्हणजे काय असतो? त्याच्या कामाचा आवाका किती मोठा असतो, याची कल्पना यावी म्हणून काही प्रसंग मांडतो. हे प्रसंग फॅमिली फिजिशियनच्या कार्यकक्षेच्या 'स्पेक्ट्रम'ची कल्पना देतात.

फॅमिली डॉक्टर हा मित्र, तत्त्वज्ञानी व मार्गदर्शक असतो. नानाविध विषयांवर त्याचा सल्ला घेतला जातो. त्याच्याशी गोपनीय गोष्टीही बोलल्या जातात. गुपिते तो वर्षोनवर्षे वाच्यता न करता सांभाळत असतो. त्याचा वावर प्रत्येकाच्या घरात अगदी स्वयंपाकघरापर्यंत असतो. बरेच जण आपली सुखदुःखे त्याच्यासमोर मांडत असतात. काहींना मन मोकळे करावयास तीच एक वाट असते. औषधोपचाराचा तो एक महत्त्वाचा पैलू असतो. अशी वाट उपलब्ध करून देणे हे त्याचे कर्तव्य असते. परंतु एक पथ्य पाळावे लागते. पेशंटशी भावनिक गुंतवणूक होता कामा नये. हे बोलणे सोपे आहे, परंतु आचरणात आणणे सोपे नसते. डॉक्टर हा काही केवळ हाडामासाचा गोळा नसतो. त्यालाही मन असते. भावना असतात. फॅमिली डॉक्टर त्याच्याकडे येणाऱ्यांना अनेक वर्षे ओळखत असतो. जवळीक असते. स्नेहबंध निर्माण झालेले असतात. बांधिलकीही असते. त्याच्याकडे येणाऱ्या पेशंटशी त्याचे भावनिक संबंध कसे असतात त्याचे हे उदाहरण बघा. अलीकडची घटना आहे. नंदा, विवाहित, वय वर्षे चाळीस. घरातल्या एकंदर परिस्थितीमुळे गांजली आहे. समस्या अशा आहेत की त्यावर सहज उपाययोजना होऊ शकत नाही. मानसिक कुचंबणा जबरदस्त आहे. माझ्यावर गाढा विश्वास आहे. मी तिला पितृतुल्य आहे. एका सकाळी आली. स्फोट झालेला होता. मी शांतपणे तिचे म्हणणे ऐकून घेतले. तिच्या उतू जाणाऱ्या भावनांना वाट करून दिली. त्यामुळे ती बरीच निवळली. तिच्या नवऱ्याला बोलावून घेतले.

"हिला आजच्या आज वडिलांकडे पुण्याला पाठवा. तिथल्या डॉक्टरच्या सल्ल्यानुसार औषधोपचार सुरू करा. मी सात दिवसांनी अमेरिकेला जात आहे. मी भारतात आहे तोपर्यंत नंदा मला रोज फोन करत जा."

मी तिच्या वडिलांनाही फोन केला. मी अमेरिकेला गेलो पण माझे मन पुण्यात होते. मी परत आल्यावर चौकशी केली. ती खूपच स्थिरावली होती. बोलता बोलता मी सहजपणे तिच्यासमोर हात पसरला. "नंदा मला एक वचन हवे आहे."

ती विस्फारित नजरेने पाहातच राहिली.

"काय वचन हवे आहे?"

"मी अमेरिकेला जाण्याच्या अगोदर तू जेव्हा आली होतीस तेव्हा तुझ्या तोंडून असे शब्द गेले की तुला जीव द्यावासा वाटतो. मला वचन हवे आहे की तू कधीही, केव्हाही असे काही करणार नाहीस. तू जर जीव दिलास तर माझे उरलेले सगळे आयुष्य मला यातनाच यातना होतील. बावन्न वर्षांत माझ्या एकाही पेशंटवर अशी पाळी आलेली नाही."तिने क्षणभर विचार केला व मला वचन दिले. मी तिला वचनाने बांधून ठेवली आहे, तिचा प्राण वाचावा म्हणून. फॅमिली डॉक्टर हा असा असतो. अशी भावनिक गुंतवणूक होत असते. हे टाळता येईल का?

### (२)वेगळा अनुभव

या आधीच्या लेखात आपण फॅमिली डॉक्टर आणि पेशंट यांच्यातील भावस्पर्शी नाते संबंधाचे उदाहरण अनुभवलेत. आज एका वेगळ्या अंगाचा नमुना सादर करीत आहे. शनिवार होता. सायंकाळी ७-३० वाजता गीताचा फोन आला.

"भाऊ (सासरे, वय वर्षे ७७) अचानक खाली कोसळले. लगेच सावरले."

"उद्या रविवार आहे, मी भेटू शकणार नाही, तरी तू आताच त्यांना घेऊन ये."

तपासले. काहीच गैर आढळले नाही. मी म्हटले, "परत असे घडले तर कळवा."

रविवारी मध्यरात्री २ वाजता माझा फोन घणघणला. "भाऊ आता बाथरूममध्ये कोसळले. काल संध्याकाळी पण एकदा असे घडले होते."

"लगेच केईएम मध्ये न्या व ई.सी.जी. आणि डोक्याचा सी.टी. स्कॅन करावयास सांगा."

मला सहा वाजता जाग आल्या आल्याच मी फोन उचलला. विचारणा केली की काय झाले? दोन्ही निष्कर्ष चांगले होते. मी विचार केला की हे कसे शक्य आहे? ३६ तासांत तीन घटना घडल्या. याचा आणखीन शोध घ्यावयास हवा. डॉ. राममूर्तींना फोन जोडला व सकाळीच भाऊंना बघण्याची विनंती केली. डॉ. राममूर्तींनी निदान केले,

"ही समस्या हृदयाशी निगडित आहे तेव्हा 'होल्टर' लावा."

हे उपकरण रुग्णाच्या शरीरावर २४ तास बांधतात व त्यात २४ तासांचा हृदयाचा आलेख येतो. होल्टरने जे दर्शविले ते धक्कादायक होते. भाऊंचे हृदय मधेमधे बंद पडत होते व आपोआप परत सुरू होत होते. एकदा तर तब्बल १६ सेकंद हृदय बंद होते. त्यांच्या हृदयाचा नैसर्गिक पेसमेकर बिघडला होता. या पेसमेकरमुळे माणसाचे हृदय नियमितपणे अविरत चालू असते. दुसऱ्या दिवशी गणेश चतुर्थी असूनही धावपळ करून पेसमेकर बसविण्याची सोय उपलब्ध करून दिली. हे जर

त्वरित केले नसते तर भाऊंचे अचानक निधन झाले असते . किंवा ते अपंग झाले असते. मी तातडीने निर्णय घेतले. ते घेण्याची मला मुभा होती. या कुटुंबाचा माझ्यावर एवढा जबरदस्त विश्वास की डॉक्टर वाक्यम् प्रमाणम्. नो क्वेस्चन्स आस्कड.

हा एक वेगळाच नमुना बघा. एक पेशंट जोडपे भेटावयास आले. मुलगा अमेरिकेत असतो. दोन महिन्यांपूर्वी येऊन एका मुलीशी साखरपुडा करून गेला. नंतर त्या मुलीने फोनवर सांगितलं,

''माझ्या पाठीवर भाजल्याचे डाग आहेत.'' झाले, मुलाचे डोके फिरले. विचार विनिमयानंतर असे ठरले की, मुलगा भारतात येऊन डाग बघणार व निर्णय घेणार. हा डाग बघण्याचा समारंभ कोठे करायचा? मुलगी बाहेरगावाहून येणार. मुलाच्या घरी त्या मुलीस अवघडल्यासारखे झाले असते. तेव्हा मला विनंती केली की, तो समारंभ माझ्या घरी करावा. मी आनंदाने संमती दिली पण मी माझ्या कन्येला, डॉ. माधवीला बोलावले. त्या मुलीच्या भावनांची कदर करणे मला आवश्यक वाटले. माधवीने डाग तपासले व निर्वाळा दिला की तिच्या हालचालीत काहीही त्रुटी नाही. त्यावर मुलगा म्हणाला की, मला डाग बघायचे आहेत. मला हे बिलकूल आवडले नाही. परंतु कोंडी फुटावी म्हणून मी म्हटले की, ''जर मुलीने स्वखुषीने संमती दिली तरच हे शक्य होईल.''

मुलगी मनमोकळी होती. तिने लगेच संमती दिली. डाग पाहून आल्यावर मुलाचे तोंड आंबुसलेलेच दिसले. इतक्या आकर्षक, सुस्वरूप, उच्चशिक्षित मुलीस नकार देण्यास न दिसणाऱ्या भागावरचे निरर्थक डाग हे सबळ कारण असू शकत नाही. खरे कारण वेगळे असावे. असो.

अशा सामाजिक समस्या घेऊन लोक आमच्याकडे विश्वासाने येतात. त्यांना योग्य तो सल्ला देणे हे आमचे कर्तव्यच असते. असा हा फॅमिली डॉक्टरच्या कार्यकक्षेचा 'स्पेक्ट्रम' असतो. भरपूर लांबरुंद!

(३) सुरुवातीचा काळ

व्यवसायाच्या सुरुवातीचा काळ १९५५. त्या काळची समाजाची जडणघडण अशी होती की समाजात डॉक्टरला आणि खास करून फॅमिली फिजिशियनला प्रचंड मान होता. फॅमिली डॉक्टर हा देवासमान मानला जात असे. तो कुटुंबाचा मार्गदर्शक असे. प्रत्येक विषयाबाबत त्याचा सल्ला घेतला जात असे. घरातील लग्नकार्ये करताना त्याचे मत आजमावले जात असे.

तसेच मुलाला कोठल्या शिक्षण क्रमाकडे पाठवावे याबाबत त्याचा सल्ला घेतला जात असे. घरगुती भांडणेसुद्धा त्याला विश्वासात घेऊन मिटविली जात असत. फॅमिली डॉक्टर हा प्रत्येक कुटुंबाचा आधारवड असे. या वटवृक्षाखाली अनेक कुटुंबे विसावलेली असत. घरातील सगळ्यांना फॅमिली डॉक्टरचा वचक असे.

माझा मित्र प्राध्यापक डॉ. शरद पुरंदरे याने तो कॉलेजात असतानाचा एक किस्सा सांगितला. एके दिवशी सकाळी ११ च्या सुमारास शरदची आई त्यांचे फॅमिली डॉक्टर साने यांच्याकडे गेली होती. डॉक्टर सान्यांनी तिला विचारले,

''वहिनी एकट्याच आलात का? (परस्त्रीला अहो-जाहो करण्याची रीत त्या काळी होती.) ऊन किती कडक पडले आहे. बरोबर यायला घरी कोणी नव्हते का?''

जेव्हा त्यांना समजले की शरद घरी होता तेव्हा त्यांनी सांगितले, ''माझ्या गाडीतून घरी जा व शरदला पाठवून द्या. त्याला उन्हातून चालत यायला सांगा.''

शरद त्यांना भेटल्यावर, ''काय रे गाढवा, आईबरोबर का आला नाहीस? तिला उन्हातान्हातून एकटीला पाठवलीस? रस्त्यात भोवळ येऊन पडली असती तर? जरा जबाबदारीने वागायला शीक.''

ती डॉक्टरांची पिढी होतीही तशीच, नीतिमान व आदरणीय. त्यांचा दबदबा असे. प्रत्येकाला त्यांच्याबद्दल भीतीयुक्त आदर वाटत असे. वैयक्तिक स्तरावर बोलायचे तर मी हा आदर, हा मान, हे प्रेम फार मोठ्या प्रमाणावर उपभोगले आहे आणि उपभोगत आहे.

सद्यःस्थिती काय आहे. ?..

आता परिस्थितीत बदल झाला आहे. नवीन पिढीतील वैद्यकीय व्यावसायिकांना गेली काही वर्षे वेगळाच अनुभव येऊ लागला आहे. डॉक्टरच्या प्रामाणिकपणाबद्दल, सचोटीबद्दल आजकाल सर्रासपणे शंका घेतली जाते. डॉक्टरांवर शारीरिक हल्ले होऊ लागले आहेत. हॉस्पिटलची मोडतोड करणे हे वारंवार घडू लागले आहे. एका हाताने कधी टाळी वाजत नसते या न्यायाने हे मान्य करावयास हवे की डॉक्टरांचे बरेच काही चुकत असणार. त्याचा वेध आपण नंतर घेऊच. परंतु असेही जाणवते की अलीकडे समाजातील काही घटकांच्या अपेक्षा अवास्तव दिसू लागल्या आहेत.

अलीकडे एका सुप्रसिद्ध क्रिकेटपटूचे निधन झाले. त्याच्या पत्नीच्या भावनांचा उद्रेक वृत्तपत्रात ठळक अक्षरांत छापलेला वाचनात आला. तिच्या तक्रारीत तथ्य असेलही. परंतु, ''हॉस्पिटलमधील एकही डॉक्टर अंत्ययात्रेला आला नाही'', हे तिच्या तोंडचे विधान तिची मानसिकता दर्शविते. हॉस्पिटलमधील डॉक्टरने रुग्णांस सेवा द्यायची की थोरामोठ्यांच्या अंत्ययात्रेला हजर राहायचे?

हे 'पेज थ्री'वाले अत्यंत आत्मकेंद्रित असतात. समाजानेच त्यांना लाडावून ठेवलेले असते. काही असो. डॉक्टरांवरील विश्वासाला मोठा तडा गेल्याचे हे लक्षण आहे. त्यांच्याबद्दल आदरभाव कमी झाला आहे. असे का व्हावे? टाळी कधी एका हाताने वाजत नसते. तेव्हा डॉक्टरांचेही काहीतरी चुकत असणार.

(४) व्यवसायास लागलेली टक्केवारीची कीड

काही वर्षांपूर्वी बोरिवलीला गेलो असताना माझा एक विद्यार्थी समोर आला. मी म्हटले,

''काय बाबू ,कसे काय चालले आहे?''

''सर, धंद्याची पुरी वाट लागली आहे.''

''काय म्हणालास? धंदा? मला वाटत होते की, तू व्यवसाय करीत असशील.''

''सॉरी सर.''

''अरे मी तर ऐकून होतो की तुझे फार चांगले चालले आहे.''

''सर, चांगले चालले होते असे म्हणा.''

''असे काय घडले तरी काय?''

'' सर, आमचाच एक गाववाला जवळच आला आहे. तो सरसकट ३५ टक्के कट् (कमिशन) देतो. त्यामुळे माझ्याकडे काम पाठविणारे आता त्याच्याकडे काम पाठवू लागले आहेत. मी बरबाद झालो आहे.''

''बाबू, हे असे व्हायचेच. असे बघ २५ टक्केवाल्याला ३५ टक्केवाल्याची भीती असणारच.''

''सर, मी काय २५ टक्केवाला की काय?'

''अलबत. मी दादरमध्ये बसलो असलो तरी माझ्या कानावर बातम्या येत असतात. एक सांग की तू प्रॅक्टिस सुरू केलीस आणि लगेचच तुझी

(पुढील मजकूर पृ. २० वर)

(फॅमिली डॉक्टर- पृ. १९ वरून)
प्रॅक्टिस कशी वधारली ? काय जादू केलीस ? कट् प्रॅक्टिस करून तात्काळ यशाच्या मागे धावू नका. हे मी जनरल प्रॅक्टिसबद्दल शिकविताना सांगितले होते. पण तू त्याचे पालन केले नाहीस.''

''सर, तुम्ही फार चांगले शिकवलेत हो. पण मी परिस्थितीचा गुलाम आहे. आमचे सगळे खानदान व्यापारी. सकाळ झाली की माझे बाबा म्हणतात की, 'आजे घणू खर्च्यू आव्यू' म्हणजे आज शौचास भरपूर झाले. हाही एक प्रकारचा खर्चच! सगळी भाषा जमाखर्चाचीच! मी एम.बी.बी.एस. झालो आणि माझे बाबा म्हणाले की, 'गोळ्यांच्या पुड्या देऊन पाच-दहा रुपये घेणारा साधा डॉक्टर होऊ नकोस. चांगला सर्जन हो. एक ऑपरेशन केलेस की पाच-पंचवीस हजार मिळतील. मी तुझ्यावर केलेला खर्च लवकर भरून येईल.'सर, मी सर्जन झालो आणि बाबांचा तगादा सुरू झाला. मी मजबूर होतो. माझ्यापुढे पर्यायच नव्हता. मी २५टक्के देऊ लागलो.''

असे अनेक २५ टक्केवाले व ३५ टक्केवाले आज आमच्या व्यवसायात मुक्तपणे वावरत आहेत. आज तेच बहुसंख्येने आहेत. माझ्यासारखे वेडेपीर थोडेच उरले आहेत. व्यवसायाचा व्यापार झाला आहे. २५टक्केवाले पस्तावलेले आहेत आणि ३५ टक्केवाले धास्तावलेले आहेत. तरीही ते आजच्या पिढीचे आदर्श आहेत.

अलीकडे अंधेरीत व्यवसाय करणारा डॉ. किशोर भगतानी भेटला होता. त्याच्याकडून एक सुरसरम्य किस्सा ऐकावयास मिळाला.''एक पेशंट आला. त्याचे अॅपेंडिक्सचे ऑपरेशन करायचे होते. त्याने खर्चाचा अंदाज मागितला. मी आकडा सांगितल्यावर त्या पेशंटने काय करावे ? जनरल प्रॅक्टिशनरने दिलेले पत्र उचलले आणि त्याच्या चिंध्या केल्या व विचारले, 'डॉक्टर आता किती होतील ?' चक्क आपल्या व्यवसायाची इज्जतच काढली.!'' ''किशोर, त्याचे काय चुकले ? समाजही आता जागरूक झाला आहे. शहाणा झाला आहे. आपले धंदे, आपल्या हिकमती, आपल्या करामती त्यांना समजू लागल्या आहेत.''

विश्वासाला हा जो तडा गेला आहे त्याचे फार दूरगामी परिणाम दिसत आहेत. अशी परिस्थिती का बरे उद्भवली ? याला कोण जबाबदार आहे ? निश्चितच वैद्यकीय व्यावसायिक याला जबाबदार आहेत. इतरही कारणे आहेत. -०-

(क्रमशः पुढे चालू-पुढील अंकी)

# सदस्य-संवाद

सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे, अंधेरी (पूर्व)
☎:२६८३६९१४ सेल-९८३३५६४२६८;ई-मेल : sitaram_khambete@yahoo.com

स. न. वि. वि.

डिसेंबर २००६ च्या हितगुज क्रमांक ६८ पासून नव्या स्वरूपात डॉ. सौ. सुमेधा मराठे यांच्या संपादकत्वाखाली हितगुजची ही रथयात्रा नवीन आव्हाने आणि नव्या कल्पना घेऊन पुढे नेताना एका तपाची मळलेली वाट सोडून दिली तरी आपण दिशा चुकणार नाही व सतत काही तरी आकर्षक देत राहिले पाहिजे या गोष्टींचे तारतम्य बाळगण्याचा प्रयत्न केला. नवनवीन सदरे, विषय, यांना जागा करायची व दर्जा अव्वल राखायचा तर मजकुराला मुक्त वाव देणे आवश्यक होते. ८/१२/१६ असे पृष्ठांचे बंधन झुगारून देणे आवश्यक होते. फोटो, रंगीत पाने, आकर्षक छपाई, भरगच्च मजकूर देताना, टाईपफेस (फॉंट साईज) लहान घेणे असे नवनवीन प्रयोग करताना हितगुजच्या जमाखर्चाचा मेळ घालणे जड जात होते. काही मोजक्या लोकांनी याबद्दल आपली नाराजी वेळी अवेळी व्यक्तही केली. तरीहि आम्हाला उदार मनाने मार्गदर्शनपर सल्ला देणारी व उत्तेजनपर कौतुक करणारी पत्रे येत राहिली. यातली केवळ हे आवडले, अमुक चांगले आहे वगैरे गोष्टींवर भर देणारी-जी एके काळी 'खुषीपत्रे' म्हणून आवर्जून प्रसिद्ध केली जात असत- ती यापुढे हितगुजमध्ये छापण्यासाठी आमचेकडे न पाठविता त्या त्या लेखकाकडे थेट संपर्क साधून कळविले तर लेखकालाही बरे वाटेल असे वाटते. यासाठीच आम्ही प्रत्येक लेखाच्या वर लेखकाच्या नावाखाली फोटो, पत्ता, दूरध्वनी ई-मेल देण्यास सुरुवात केली आहेच. मात्र आमच्या माहितीसाठी आपण पत्रे जरुर पाठवावी. त्यांची न छापताही दखल घेऊच.

तसेच यापुढे आलेल्या सूचना-तक्रारवजा पत्रांचा गोषवारा देऊन आमची प्रतिक्रिया या सदरातून देत राहू. अशी काही पत्रे येणेप्रमाणे.

१. श्री. दिनकर मुकुंद (नानाकाका) मराठे यांचे सिंहगड पायथा, आतकरवाडी, पुणे-४२ येथील घर (फार्म हाऊस) मराठे परिवारातील लोकांना पिकनिकसाठी ५० टक्के सवलतीत देऊ केले आहे. (त्यांचे या विषयीचे मूळ पत्र सप्टेंबर २००७ च्या अंकात पहा). अधिक तपशीलासाठी सौ. नीलांबरी मराठे, द्वारा व्यंकटेश बुक डेपो, आप्पा बळवंत चौक, पुणे ४११०३० (फोन-२४४५६२७०) यांच्याशी संपर्क साधावा.

२. तिस्क-उसगांव (गोवा) येथील 'मराठे फर्निचर' दुकान नं.२३,डॉम्निक प्लाझा, फोन-(०८३२) ०२३४५०६० या दुकानाचे चालक श्री. गोविंद नारायण मराठे (पृ.५४१) आपल्या दुकानात ब्राह्मण वधूवर मंडळ चालवितात, त्यांचेकडे वरांची स्थळे आहेत पण वधूंची नोंदणी-नावे संपली आहेत. तरी गोवा, बेळगाव,सांगली, कोल्हापूर, पुणे आदि ठिकाणच्या वधूपित्यांनी संपर्क साधावा. तसेच त्यानी आपले मध्यवर्ती ठिकाणचे एक दुकान संपर्क कार्यालयासाठी नाममात्र भाड्याने देऊ केले आहे.

३. पुण्याचे श्री. विष्णू रामचंद्र मराठे (पृ. ४१)यांनी ७-८ सह्यांचे एक निवेदन (हितगुजला हा बहुधा अनोखा प्रकार असावा. सह्या करणारांनी पूर्ण नावे-पत्ते दिले असते तर ?) पाठवून आपले मराठे हे नांव चित्पावन संमेलनाच्या वेळी अन्य कुल संमेलनामध्ये दिसले नाही याबद्दल नाराजी व्यक्त केली अहे. याबद्दल मराठे प्रतिष्ठानची सुस्पष्ट भूमिका याच अंकात संपादकीयात मांडली आहे. शिवाय या निवेदनावरच सही करताना धनप्रभा मराठे यांनी आपण मांडलेल्या स्वतंत्र भूमिकेची साथ केलीआहे.

४. अंबरनाथचे मनोहर दामोदर मराठे (पृ,२७५) यांनी जागतिक चित्पावन संमेलनाच्या निमित्ताने ब्राह्मण समाजाच्या अवस्थेबद्दल निराशा व्यक्त केली आहे. त्यांना आपली अधोगति, स्नान-संध्या न करणे इ. गोष्टी व्यथित करतात. मात्र त्यानी हितगुजचे सध्याचे स्वरूप उलटे फिरवून फक्त मुखपत्रापुरते पूर्वी होते तसे करावयाला विरोध दर्शविला आहे.

एकूणच आपल्याला नवे हितगुज आवडते आहे हे आम्हाला प्रेरणादायी वाटते. आपण साहित्य पाठविताना सोबत आपला पासपोर्ट आकाराचा फोटो पोस्टाने किंवा ई-मेलने स्कॅन करून पाठवावा. तसेच पूर्ण पत्ता, फोन व सेल नंबर, आणि आपल्या परिवारातील प्रत्येकाचा ई-मेल आम्हाला कळवावा किंवा त्याना आमच्याशी संपर्क करण्यासाठी सुचवावे. कुलवृत्तांताची संबंधित पृष्ठे त्यांच्या माध्यमातून आपणास मिळतील व ती सुधारून आमचेकडे पाठविल्यास आपोआपच सुधारित कुलवृत्तांत तयार होऊन हा अभिनव उपक्रम यशस्वी होण्यास आपल्या सर्वांचा हातभार लागेल. कळावे आपला ,

सी.गो. खांबेटे, सहा.संपादक, हितगुज



# आठवणीतली ताई

-श्री. अरविंद दामोदर मराठे(पृ. २१२),
आर एल ८२, सदय , एम आय डी सी रेसिडेन्सी झोन, मिलापनगर, डोंबिवली (पू.)
जि. ठाणे ४२१००३; दूरध्वनी: ( ९५२५१) २४७०६७७

(प्रतिष्ठानचे पूर्वाध्यक्ष व एक विश्वस्त श्री. अरविंदराव मराठे यांच्या मातोश्रींच्या शतक महोत्सवाचा एक भाग म्हणून त्यांचे 'आठवणीतील ताई' हे भाषण शब्दश: देण्याचा प्रयत्न केला आहे. हेतू हा की प्रतिष्ठानच्या दूरवरच्या वाचक सदस्यांना त्यांच्या खास शैलीचा परिचय व्हावा. काहीसा खेळकर पण तितकाच खट्याळ,खुसखुशित विनोदी ढंग, आवाजातील माफक पण परिणामकारक चढउतार, प्रतिक्रिया अजमावून पाहण्यासाठी घेतलेले सूचक पॉझेस, नाकावर ओघळलेल्या चष्म्यावरून श्रोत्यांशी साधलेली थेट दृष्टीभेट, आणि देहबोलीचा नाट्यमय वापर ही त्यांच्या भाषणाची काही खास वैशिष्ट्ये. ती अनुभवण्यासाठी खरे तर आपण प्रत्यक्ष श्रोता असणे आवश्यक आहे. पण तशी कल्पना करून हे छोटेखानी भाषण सावकाश वाचले तरीही त्यांच्या शैलीचा काहीसा अंदाज बांधता येऊ शकेल. आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्या.- सी. गो. खांबेटे, सहसंपादक.)

आमची ताई. काय सांगावे.. ताईच्या खास विशिष्ट अशा आठवणी सांगणे हे फार मुश्किल आहे. कारण तिची जगण्याची जी रीत आहे तीच सर्व मुलांना एक शिकवण देऊन गेली. तिचा महत्त्वाचा पैलू असा आहे की कोणत्याही घटनेकडे, व्यक्तीकडे ती निकोप दृष्टीने पहात असते. दुसऱ्या बाजूचा विचार करणे हा तिच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. एखाद्या ठिकाणी आपली उपस्थिती त्रासदायक असेल असे वाटले तर तेथून दूर होणे ती पसंत करीत असे. जीवनाकडे थट्टेखोर, खेळकर दृष्टीने ती पहात असे. सर्व मुलांच्या स्वभावामध्ये हा गुण, सद्गुण - दुर्गुण, जो असेल तो, उतरला आहे... ..

तर अशा तऱ्हेने व्यवहार चालतो. आमचे शेजारी आहेत, उदयराव प्रभुदेसाई. त्यांचा आजीवर जीव आहे. आजीचाहि त्यांच्यावर आहे. बरेच दिवसात ते आले नाही. परवाच्या दिवशी त्यांना निमंत्रण मिळाले म्हणून ते आजीला भेटायला आले.

"इतके दिवस कुठे तोंड घेऊन गेला होतात?" ....हा माणूस लार्सन टूब्रोमध्ये जनरल मॅनेजर म्हणून रिटायर झालेला बरं का.

"तसं नाही हो आजी. पण जमलं नाही यायला."

"अहो शेजारी राहता आणि जमलं नाही म्हणता? पूर्वी यायचात."

"नाही, आता येत जाईन"....

अभिजितचा एक मित्र आहे, सुभराव. खूप मोठा ऑफिसर आहे. सीएआयसीडब्ल्यू झालाय. आता दुबईला असतो. तो आणि अभी एकत्र अभ्यास करायचे. हा सुबराव रात्री ११ नंतर येणार. बेल वाजली कि समजावं तो आला असणार.

"काय आजी, कसं काय?".

"अरे ही यायची वेळ आहे का?" पहिला प्रश्न. मग तो आजीजवळ बसणार.. पायाला हात लावणार.. "अहो आजी आता वेळ मिळाला म्हणून आलो".

"आता लक्षात ठेवा. ११ नंतर यायचं नाही".

पुन्हा दुसऱ्या दिवशी तेच. आता आजी बोलते ते जी परिचित मंडळी आहेत, ज्याना आजीचा स्वभाव माहीत आहे, ती फारसं मनावर घेत नाहीत.

आमच्या मिसेसची एक मैत्रिण... सुरेखाताई जोशी. त्यांच्या एका मंडळात ती असते. तिला आता सून-जावई आले आहेत...म्हणजे ५०-५५ वर्षाची असेल. ताईची अन् तिची दोस्ती.

"इथे येऊन गप्पा छाटत बसायच नाही.भजनं म्हणायला बसा."

एकदा ती बिचारी, काय हौस आली, ती पंजाबी ड्रेस घालून आली. आणि तिला काय दुर्बुद्धी सुचली.. ती ताईला भेटायला गेली.

"काय ताई कसं काय?"

"आमचं चांगलं आहे... हे काय केलंय?"

"नाही हा पंजाबी ड्रेस.. सुनेनं आणलाय."

अस काहीतरी सांगितलं असेल..

" हे आता शोभत नाही."

" मग तुमच्या नाती घालतात त्या ?"

"त्या नाती आहेत. त्याना घालू दे. आता जावई आले, सुना आल्या. हे असले थेर झेपत नाहीत तुम्हाला. चांगलं नाही दिसत ते तुम्हाला."

आमच्या बायकोनी एकदा गाऊन घातला. आणि सासूबाईना दाखवायला गेली. परवानगी असेल तर सांगतो.. पण आता सुरुवात केली आहे तर सांगतोच. काय व्हायचं असेल ते होऊ दे.... आणि प्रेमानं विचारायला गेली.

"कसं दिसताय?"

"ध्यान दिसतंय! हे असलं परत घालत जाऊ नकोस. मी गेल्यावर काय ते ठरवा! " ... ...

यालाही आता पंचवीस वर्ष होत आली. ...अजूनहि बायकोला गाऊन घालायला मिळाला नाही! ......आणि तो मिळूही नये अशी आमची सर्वांची इच्छा आहे.!

शंभर वर्ष पुरी झाली याबद्दल आपण सत्कार करतो. गावसकरच्या बॅटिंगबद्दल असं सांगतात कि शतक झालं की तो परत गार्ड घ्यायचा. नवीन इनिंग सुरू करायचा.

आपल्या सर्वांच्या तर्फे मी ताईला शुभेच्छा देतो कि "तिने परत गार्ड घ्यावा.... नविन इनिंग सुरू करावी. आणि दुसऱ्या शताब्दीलाही आम्हाला बोलवावं. आम्हाला यायला आवडेल.!"

(इतक्यात आजीचा एक नातू तिला एक लहान मुलांची खेळण्यातली बॅट अर्पण करतो.. बॅटवर आजीचा फोटो आणि शतकाचा उल्लेख.)

मला हे माहित नव्हते!

आता थोडंसं वय झाल्यामुळे ताईला ऐकायला कमी येतं. ते एका अर्थी बरं असतं. आम्ही काहीही बोलू शकतो. पूर्वीहि काहीही बोलायचो. त्यावेळी तिची ताकद होती. आपल्याला डॉक्युमेंटरीमध्ये बघायला मिळेल. तिची उंची आणि तब्येत वगैरे सणसणित होती. मुलांचे दोन हात जर एका हातात धरलेन तर टाप नव्हती मुलाची हात सोडून जायची!

एकदा मी, ताई, आमचे मोठे बंधू आणि तिच्या दोनचार सुना वगैरे गप्पा मारत बसलो होतो. धाकट्या भावाच्या तोंडून 'सहस्त्रबुद्धे' शब्द आला. ....ते तिला बरोबर ऐकायला आलं.! सहस्त्रबुद्धे हे तिचं माहेर. आणि माहेराबद्दल या भगिनी किती जागरूक असतात हे सर्व पुरुष मंडळींना माहित आहे.! ताईने नेहमीप्रमाणे म्हटलं, 'ही मराठे मंडळी आहेत ना, ती सगळी मिजासखोर.!' कदाचित २५ वगैरे सालापासून ती हे म्हणत असेल. तर महेश्वर म्हणाला, "८० वर्षांपेक्षा जास्त मराठ्यांकडचं खात्येस आणि अजून मराठ्यांना नावं ठेवतेस?"

तर या सुना सगळ्या म्हणाल्या, "बरोबर आहे, बरोबर आहे" सुना सगळ्या एक झाल्या होत्या. आणि ताई , ती तर आद्य सून! ताईने सांगितलं,

" महेश्वर, तुझं कानफट फोडायला पाहिजे."

त्यावेळी महेश्वरचं वय देखील ५० वगैरे होतं. पण ताईची ती उमेद होती. . महेश्वर म्हणाला,

"अगं, असं आहे, या सुनांच्या तू नादी लागू नकोस. मराठ्यांबद्दल बोलायचं असेल तर सरस्वती यांच्या जिभेवर डिस्को करते. आणि त्या काहीही म्हणाल्या तरी तू म्हणता कामा नये. तू मराठ्यांची सून असलीस तरी आम्हा सर्वांची आई आहेस."

(पुढील मजकूर पृ. २२ वर)

(संपादकीय - पृ. १ वरून )सकाळच्या सत्रातील विक्रम गोखले यांचे उद्घाटनपर भाषण, अनुराधा मराठे, प्रमोद रानडे, केतकर यांची संगीत कार्यशाळा, परदेशातील शिक्षणसंधी व सूत्रसंचालन विषयक कार्यशाळा यांसारखे माहितीपर, उद्बोधक व विचारांना चालना देणारे चांगले कार्यक्रम आपण सर्वजण सुरुवातीपासून बसल्या जागी नीटपणे सलग पाहू शकलो. यापैकी संगीत कार्यशाळेतून तर अत्यंत अल्पशा वेळातही उत्तम रसास्वादसुद्धा घेता आला. श्रीमती अनुराधा मराठे यांच्या सुस्वर आवाजाची मोहिनी मनावर पडून सारा आसमंत जणू मंत्रमुग्ध झाला.

६० आडनांवाची कुलसंमेलने वेगवेगळ्या ठिकाणी भरविली गेल्याने त्या त्या कुलांच्या सदस्यांची धावपळ चालली होती. कांही ठिकाणी अपेक्षेपेक्षा खूप अधिक लोक आल्याने आयत्या वेळी संमेलनस्थळे बदलावी लागली व थोडीफार गोंधळाची परिस्थिति निर्माण झाली. यामुळे कित्येकाना भोजनोत्तर सत्रासाठीसुद्धा मुख्य संमेलन स्थळी संध्याकाळपर्यंत पोहोचताच आले नाही. आपला मराठे परिवार खूप मोठा असल्यामुळे सर्वांचीच गैरसोय होण्याची भिती होती त्यामुळे आपला निर्णय प्रत्यक्षात योग्यच होता असे अनुभवान्ती अनेकांनी आम्हाला नंतर आवर्जून कळविले आहे. असो.

चित्पावनांचे पहिले वहिले जागतिक महासंमेलन तरीही न भूतो न भविष्यति असे यशस्वीपणे संपन्न झाले हे मान्य करावयास हवे. यामुळेच अनेकांच्या पोटात दुखू लागले. चित्पावनांचे हे उत्स्फूर्त व स्वखर्चाने केलेले शांततामय शक्ती प्रदर्शन पाहून तर अनेक पगारी लेखणीबहाद्दरांच्या झोपा उडाल्या. या संदर्भातील श्री. विद्याधर दाते यांच्या महाराष्ट्र टाईम्समधील लेखातील आक्षेपांचे खंडण करणारा श्री. विक्रम गोखले यांचा लेख तर उत्कृष्ट, दिशादर्शक, अपसमजमुक्त, कोणताही आकस न ठेवता, सारासार विचाराने विवेकपूर्ण शैलीत लिहिलेला असून प्रत्येक चित्पावनाने वाचावा व त्यावर विचार करून कृति करावी अशा योग्यतेचा आहे.

कोण्या एका काळी विशिष्ट सामाजिक व राजकीय परिस्थितीत अस्पृश्यतेचा, जाति व्यवस्थेतील उच्चनीचतेचा विचार प्रभावी होण्यास कारणीभूत मानल्या गेलेल्या ब्राह्मणांच्या कित्येक पिढ्या होऊन गेल्यानंतर आजही कोणीही उठावे आणि झोडपावे अशी वागणूक मिळूनही या समाजाकडून कोणताच प्रतिवाद केला जात नाही. खेडेगांवात दलितांवर होणाऱ्या अत्याचारात आज ब्राह्मणांचा नव्हे तर ब्राह्मणेतरांचाच सहभाग असतो. तरीही समाजपातळीवर दलितांच्या द्वेषाचे लक्ष्य मात्र अजूनही ब्राह्मणच असतात. फार काय, ब्राह्मणद्वेष हेतुतः पसरविण्यात धन्य मानणाारे स्थानिक तसेच अत्युच्च पातळीवरचे राजकीय नेते, व साहित्यिक पातळीवर दबदबा असलेली लेखक मंडळी यांचेकडून नाटक-सिनेमातून भट, भटुरडा, बामण असा हेटाळणीयुक्त उल्लेख (पहा- एक डाव भटाचा) सर्रास केला जातो, इतकेच काय साहित्य संमेलनासारख्या पवित्र शारदोत्सव प्रसंगीच्या स्मरणिकांमध्ये सुद्धा या ब्रह्मद्वेषाचे ओंगळ प्रदर्शन सर्रास केले जाते व याची कोणी साधी दखलही घेत नाही. (जातिवाचक उल्लेख, जसे महार, चांभार, भंगी, चुकून जरी झाला तरी खास कायद्यामुळे कठोर शिक्षा होऊ शकते. हा न्याय अत्यल्पसंख्य- आता दोन अडीच टक्के सुद्धा नसलेल्या- ब्राह्मणानी का मागू नये?) खेदाची गोष्ट म्हणजे याच समाजातून जन्माला आलेल्या आगरकर, स्वा.सावरकर, महर्षी कर्वे, आचार्य विनोबा भावे यांच्यासारख्या अनेक समाजसुधारकांनी अंगिकारलेल्या अस्पृश्यतानिवारण, पतितोद्धार जातिभेदविरोधी चळवळी, यांसारख्या उदात्त कार्याची पुरेशी दखलही घेण्याचे हेतुपुरस्सर टाळले जाते.

म.गांधींच्या हत्येनंतर महाराष्ट्रात जातीय सूड भावनेतून कित्येक निरपराध ब्राह्मणांना घरादारांसकट जाळण्यात आले. त्यांचे कारखाने, फिल्म-स्टुडिओ, बेचिराख झाले. कुळकायद्याने जमिनी हिसकावून कसणाऱ्या शेतकऱ्याला परस्पर दिल्या गेल्या. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ते योग्यहि होते. पण तरीही एकाही ब्राह्मणाने भिकेसाठी हात न पसरता आणि आत्महत्याही न करता आपला उद्धार करण्याचे मार्ग स्वतंत्रपणे चोखाळले. त्यानी साधी कर्जमाफीही कधी मागितली नाही की शासनाकडून खऱ्याखोट्या सवलती उपटल्या नाहीत.

आरक्षणामुळे, राजकीय कार्यक्षेत्रे, तसेच सरकारी/निम-सरकारी कार्यालये, शिक्षणसंस्था, या पारंपरिक नोकरीच्या जागांवरुन ब्राह्मणांना गुणवत्ता असूनही अक्षरशः हुसकावले गेले आहे किंवा पदोन्नतीपासून अपमानास्पदरीत्या वंचित केले गेले [illegible] ठा’ शाहीचा निरंकुश अंमल असूनही आरक्षणाच्या कवच कुंडलासाठी ‘मला आता ओ.बी.सी. म्हणा’ हा ‘मराठा’ राग तारस्वराने आळविला जात आहेच!

ब्राह्मण समाजाचे मात्र तसे नाही. तो असुरक्षित म्हणून न जगता प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेत आला आहे. कारण त्याचा आदर्श आहे भगवान परशुराम. परशुरामाने सर्व वेद आणि स्थापत्य, वास्तुशिल्प, अणुविज्ञान, आयुर्वेद, कृषिविज्ञान आदि विविध शास्त्रे आत्मसात् करून भडोचपासून कन्याकुमारीपर्यंतची पश्चिम किनाऱ्यावरची भूमी समुद्राला हटवून (रेक्लमेशन) संपादन केली; इतकेच नव्हे तर विविध प्रयोग करून ती शेतीसाठी योग्य केली. भगवान परशुरामांचे हे असाधारण कर्तृत्व आजही आपल्यास उद्बोधक ठरते.

आजच्या युगात सर्वांगीण प्रगतीसाठी ब्राह्मतेज व क्षात्रतेज यांचा एकत्रित आविष्कार आवश्यक आहे. या दोन्हींसाठी पुन्हा परशुराम हाच एकमेव आदर्श आहे! जय परशुराम!!

-०-

---

(आठवणीतील ताई- पृ. २१ वरून)
यावर ताई म्हणाली, “ते तू मला काही सांगू नकोस. तुम्ही मिजासखोरच आहात.”

त्या गप्पागोष्टींमध्ये, हसण्यामध्ये हा विषय संपला.

सहस्त्रबुद्धे.. हा तिचा एक वीक पॉईंट आहे. अण्णांवर एकदा आपत्ती आली. आईच्या अंगावर शेरभर सोन्याचे दागिने मी पाहिले आहेत. आणि मग ते दागिने सगळे देऊन टाकावे लागले. परिस्थितीशी मुकाबला करायचा तर हे काही ठेवता येण्यासारखं नव्हतं असं अण्णाना वाटलं. दोन्ही आयांनी मंगळसूत्रंसुद्धा दिली. अण्णांचं लक्ष हिच्या कुड्यांकडे गेलं.. कानातली कुडी. हिनं हिम्मत केली आणि सांगितलं,


“त्याच्याकडे बघू नका. ती माझ्या भावाने, अण्णाने दिलेली आहेत. ती सहस्त्रबुद्ध्यांकडची आहेत. तुमची नाहीत”. ती कुडी आजही तिच्याकडे आहेत.!

सहस्त्रबुद्ध्यांच्या तीन गोष्टी. सहस्त्रबुद्ध्यांची गंगू, तिच्या कानातली कुडी आणि जीवनाकडे बघायचा एक निकोप दृष्टिकोन या तीन वस्तू आमच्याकडे आहेत.

मी समस्त सहस्त्रबुद्ध्याना आश्वस्त करु इच्छितो की त्यांनी अगदी निश्चिंत राहावं, त्यांची गंगू आमच्याकडे अगदी सुखरूप आहे.

-०-

## क्षणचित्रे

१ 

२ 

३ 

४ 

५ 

१.उत्सवमूर्ती- श्रीमती सत्यभामाबाई मराठे.   २.लेकी-सुना-नातींकडून शतदीपयुक्त औक्षण   ३.सुपुत्र अरविंदांकडुन अभ्यागतांचे स्वागत. ४. नातू अभिजित व अन्य कुटुंबियांकडून तुलादान विधीचे सकौतुक निरीक्षण. ५. खास निमंत्रित महिलावर्गापैकी काही मराठे -(ओळखा पाहू!)

## अभीष्ट चिंतन - नाबाद शंभर!

संकलनः डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे

मराठे परिवारातील पणजीबाई श्रीमती सत्यभामा दामोदर मराठे यांनी शतक झळकावले!

मराठे परिवारातील पणजीबाईंची सेंचुरी!!
शतवर्षांच्या संवत्सरिची साक्षिदार तू खरी ।
सत्यभामा नामे तुजला वंदिती पुजिती सारी ।।

सोबतच्या निमंत्रणाला मान देऊन आलेल्या अभ्यागत हितचिंतकांच्या व स्नेहीजनांच्या उपस्थितीने तुडुंब भरलेला, डोंबिवलीच्या सिटी मॉल मधील रोषणाईने झळकत असलेला, हेरिटेज हॉल, ताईंचे अभिनंदन करण्यासाठी व त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी हर्षोत्सुक झाला होता; या सोहळ्यातील सहभागामुळे धन्य समजत होता!

निमित्त होते मराठे प्रतिष्ठानचे एक विश्वस्त व माजी अध्यक्ष श्री. अरविंद दामोदर मराठे यांच्या मातोश्रींचा, नातवंडानी साजरा केलेला आजीचा, १३जानेवारी २००८रोजीचा शतसंवत्सरी महोत्सव.

ठीक वेळेवर गणेशवंदनेने सुरू झालेल्या या कार्यक्रमामध्ये आजीच्या जीवनावर कलात्मकपणे तयार केलेल्या व्हिडियोचे मोठ्या पडद्यावर प्रदर्शन करण्यात आले. यामध्ये आजींच्या बालपणातील काही

> श्री
>
> स.न.वि.वि.
>
> एकोणीसशे साठ साली, याच सुमारास, दूर कोकणात एका बाळाचं षष्ठी पूजन झालं. लेख लिहून झाल्यावर सटवाईनं बाळाच्या कानांत हळूच सांगितलं.... "सगळंच छानछान नाही लिहिता आलं ग तुझ्या ललाटी.... पण तू ना, थेट शंभरी पार करशील, खुशाल."
>
> शुभंकर वास्तूनंही तोंडभर आशीर्वाद दिला- "तथास्तु!"
>
> ते बाळ म्हणजे .... तुम्हा सर्वांच्या ताई. आम्हा नातवंडांची आजी आणि जगासाठी- श्रीमती सत्यभामा दामोदर मराठे. तिनं ललाट लेखाप्रमाणे शंभर वर्षं पुरी केलीच.... पण खुशाल नव्हे, तर अपार जिद्दीन!
>
> आमच्या आजीच्या शंभराव्या समृद्ध वळणावर आपण सारीजणं तिचं अभिनंदन करूया!
>
> रविवार तेरा जानेवारी दोनहजार आठ रोजी, आपण सर्वजणं भेटणार आहोत. जरूर यायचं.
>
> स्वागतोत्सुक
> - आाजीची नातवंडं.

प्रसंगांचे त्यांनी केलेले उल्लेख-सावरकरांकडे जाणे-येणे, प्रभातफेरीतील गाणी खणखणित आवाजात म्हणणे, आपण होऊन उदार मनाने स्वीकारलेल्या सवतीशी एकत्र गुण्या-गोविंदाने नांदणे, एकमेकांची मुले सारख्याच मायेने वाढविणे, या सर्वच गोष्टी प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या होत्या.

त्यानंतर मुलाबाळानी आजीच्या आठवणीना उजळा दिला. अश्विनी मयेकर हिने आजीची प्रकट मुलाखत घेऊन तिला भूतकाळातील रम्य फेरफटका घडवून आणला. आजीच्या तोंडून आजही माहेरचे (सहस्त्रबुद्धे) गोडवे आणि सासरच्या(मराठे) मंडळींच्या तिरसटपणाच्या, जमदग्नीसारखे कोपिष्ट असल्याच्या तिखट-कडू आठवणी ऐकताना स्त्रीस्वभावाचा कालातीत स्थायीभाव सहजपणे प्रत्ययाला आला!

केवळ अरविंदरावांच्याच 'आठवणीतील ताई' प्रातिनिधिक या नात्याने स्वतंत्रपणे त्यांच्याच शब्दात रंगविली आहे (पृ.२१ पहा). अन्य अनेकांनी आपल्या स्मृतींना असेच भरभरून शब्दरूप केले.

मराठे प्रतिष्ठानचे कार्यकारिणी सदस्य या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

शेवटी आर्जीच्या कुटुंबियानी सादर केलेला गीतगायनाचा कार्यक्रम व्यावसायिकांच्या तोडीचा असावा इतका दर्जेदार व रंगतदार झाला . प्रेक्षकानी कित्येक वेळा वन्स मोअर देऊन उत्स्फूर्त दाद दिली.

अखेर शतायुषी आजींच्या आशीर्वादाचा ठेवा व सुग्रास भोजनाचा लाभ घेऊन या अपूर्व सोहळ्याची सांगता झाली.

-०-

BOOK POST

**If undelivered, please return to:**

सहायक संपादक,
हितगुज
श्री.सीताराम गो.खांबेटे
ए१३,संपदा सोसायटी
स्वामी नित्यानंद मार्ग,
अंधेरी-पूर्व,
मुंबई ४०००६९

त्रैमासिक हितगुज हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.

पत्रव्यवहाराचा पत्ता: सहायक संपादक:श्री.सीताराम गो.खांबेटे,ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९;
दूरध्वनी: २६८३६९९४; मोबाईल : ९८३३५६४२६८.ईमेल (1) sitaram_khambete@yahoo.com
(2) maratheparivar@yahoo.co.in वेबसाईट : **www.marathepratishthan.org**

चित्रसूची


| अनु. | पृ. | स्थंभ | विषय |
|---|---|---|---|
| १ | १ | १ | डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे |
| २ | १ | ३ | सौ.नीलांबरी रमेश मराठे |
| ३ | ३ | १-२ | १.कु.तनया प्रशांत मराठे -गणेशवंदना |
| ४ | | | २.श्री.ह.मो.मराठे यांचे स्वागत. |
| ५ | | | ३.श्री.भाऊ मराठे |
| ६ | | | ४.कु.सानिका विनोद जोशी |
| ७ | | | ५.श्री.रमाकांत विद्वांस |
| ८ | | | ६.श्रीमती सुलभाताई मराठे |
| ९ | | | ७.श्री.संजय रामचंद्र मराठे |
| १० | | | ८.श्री.रोहित अविनाश विद्वांस |
| ११ | ३ | ३ | गुढीपाडवा |
| १२ | ५ | ३ | श्री.रोहित विद्वांस |
| १३ | ५ | ३ | श्री.श्रीधर मराठे |
| १४ | ६ | १ | श्री.सी. गो. खांबेटे |
| १५ | ८ | १ | सौ.राधा मराठे, |
| १६ | ९ | १ | सौ. वृषाली वामन मराठे |
| १७ | ९ | १ | श्री.रमाकांत म. विद्वांस |
| १८ | १० | १ | श्री.भाऊ मराठे, |
| १९ | ११ | १ | सौ.कमला यशवंत जोशी, |
| २० | १२ | १ | श्री.ह.मो. मराठे, |
| २१ | १४ | १ | सुनीती ज. मराठे |
| २२ | १६ | १ | श्रीसमर्थ रामदास |
| २३ | १८ | १ | डॉ.मधुसूदन पु. विद्वांस, |
| २४ | २० | १ | श्री.अरविंद दामोदर मराठे |
| २५ | २३ | १-३ | १.श्रीमती सत्यभामाबाई मराठे. |
| २६ | २३ | १-३ | २.लेकी-सुना-नातींकडून शतदीपयुक्त औक्षण |
| २७ | २३ | १-३ | ३.सुपुत्र अरविंदांकडुन अभ्यागतांचे स्वागत. |
| २८ | २३ | १-३ | ४.नातू अभिजित व अन्य कुटुंबिय |
| २९ | २३ | १-३ | ५.खास निमंत्रित महिलावर्गापैकी काही मराठे |
| ३० | २४ | १-४ | निर्माण जाहिरात |